POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

उप संपादिका : सौ. प्रीती दिपक नाईक    कार्यकारी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-२२३ ● मुंबई, मंगळवार, १७ मार्च २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## कुणी इथेनॉल, कुणी घासलेट तर वेस्टेड ऑईलपासून पेटवताेय शेगडी

### डोकेबाजांनी लढवली अफलातून शक्कल

**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

इराण-इस्रायल आणि अमेरिकेच्या युद्धाचा फटका संपूर्ण जगाला बसला आहे. इराणच्या कच्च्या तेलावर जगभरातील असंख्य देश अवलंबून असल्याने युद्धामुळे तेलाचा पुरवठा थांबला आहे. त्यामुळे जगभरात इंधनाची समस्या निर्माण झाली आहे. भारतातही इंधनाची मोठी समस्या झाली आहे. व्यावसायिक गॅसचा पुरवठा बंद करण्यात आला आहे. तर घरगुती गॅससाठी लोक लाईनीत उभे आहेत. अनेकांनी तर चुलीवर स्वयंपाक करण्यास सुरुवात केली आहे. घरगुती गॅस मिळण्यास अडचणी येत असल्याने मुंबई महाराष्ट्रातील नागरिकांनी तर वेगवेगळ्या आयडिया अवलंबण्यास सुरुवात केली आहे. कुणी चूल पेटवण्यासाठी लाकडांचा वापर करत आहे, तर कुणी गोवऱ्यांचा वापर करत आहे. काहींनी तर चक्क इथेनॉलचा वापर सुरू केला आहे. घासलेट आणि वेस्टेड ऑईलपासूनही चुली पेटवल्या जात आहेत. डोकेबाजांनी अफलातून शक्कल लढवल्याने त्यांचा घरगुती गॅसचा प्रश्नही सुटला आहे.



**पालघरमध्ये अनोखा प्रयोग :** गॅसच्या तुटवड्यावर मात करण्यासाठी पालघर जिल्ह्यातील खोडाळा गावात वेल्डिंग कारागिरांनी अनोखी शक्कल लढवली आहे. टाकाऊ तेलापासून म्हणजे वेस्टेड ऑईलपासून चुली पेटवण्यास सुरुवात केली आहे. एक विशिष्ट प्रकारची शेगडी तयार करून यात वेस्टेड ऑईल टाकून ही शेगडी स्टोव्ह सारखी पेटवली आहे. चंद्रकांत सदाशिव बारगिरे असे शेगडी बनविणाऱ्या वेल्डिंग कारागिरांचे नाव असून पालघर जिल्ह्यातील अतिदुर्गम असणाऱ्या मोखाडा तालुक्यातील खोडाळा गावाचा तो रहिवाशी आहे. आखाती देशात सुरू असणाऱ्या युद्धामुळे तुटवडा निर्माण झालेल्या गॅस मुळे आता हॉटेल व्यवसाहिकानी घाबरून न जाता या ही देशी शेगडी त्या प्रत्येकाला तारू शकते, असं चंद्रकांत यांचं म्हणणं आहे.

**मुंबईत स्टोव्हवरचा नाश्ता :** मुंबई एलपीजी सिलिंडरचा तुटवडा निर्माण झाल्यापासून छोटे व्यावसायिक आणि स्टॉलधारक पयार्यी साधनांचा वापर करत आहेत. काही जणांनी केरोसिनवर चालणाऱ्या स्टोव्हचा पुन्हा वापर सुरू केलाय. काही जणांनी कोळश्यांच्या शेगड्यांचा वापर करायला सुरुवात केली आहे. सिलेंडरचा तुटवडा निर्माण झाला आहे. अशावेळी व्यवसाय सुरू ठेवण्यासाठी हे मार्ग निवडल्याचं स्टॉलधारक सांगत आहेत. शिवाय सकाळच्या नाश्त्याच्या पदार्थांमध्ये काही रुपयांची वाढ केल्याचंही स्टॉलधारक सांगत आहेत.

**कोपरगावात इथेनॉल स्टोव्हचा प्रयोग**

अहिल्यानगरच्या कोपरगावातील संजिवनी उद्योग समुहाने गॅसला पर्याय म्हणून संपूर्णपणे इथेनॉलवर चालणाऱ्या स्टोव्हचे संशोधन केलंय. गॅस टंचाईवर मार्ग काढण्यासाठी संजीवनी उद्योग समूह आणि शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याने हा एक अनोखा पर्याय शोधला आहे. पुणे येथील संस्थेच्या सहकायार्ने इथेनॉलवर चालणाऱ्या स्टोव्हचे संशोधन करण्यात आले आहे. यावर सरकारने धोरणात्मक निर्णय घेतल्यास सर्वांना याचा लाभ होणार आहे. कोपरगाव तालुक्यातील शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याने यापूर्वी सीएनजी प्लांट उभारून सीएनजी गॅस उत्पादन सुरू केले आहे. आता याच साखर कारखान्याने संजीवनी उद्योग समूहाच्या सहकायार्ने व्यावसायिक गॅसला पर्याय शोधण्याचा प्रयत्न केला आहे. देशभरात इथेनॉल निर्मिती मोठ्या प्रमाणात वाढली असून त्याच इथेनॉलवर आधारित स्टोव्ह तयार करण्याचे संशोधन पुणे येथील एका संस्थेच्या माध्यमातून करण्यात आले आहे

## रुग्णालय की मृत्यूचा सापळा?

### सरकारी रुग्णालयाच्या आयसीयूमध्ये उंदराने कुरतडल्यामुळं वृद्ध महिलेचा मृत्यू

**■मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबईला लागून असलेल्या भाईदर पश्चिम येथील सरकारी रुग्णालयातून एक संतापजनक घटना समोर आली आहे. भारत रत्न पंडित भीमसेन जोशी रुग्णालयातील अतिदक्षता विभागात उपचार घेत असलेल्या एका ८९ वर्षीय वृद्ध महिलेचा उंदराने कुरतडल्यामुळे मृत्यू झाला आहे. आयसीयूमध्ये उंदराने महिलेच्या हाताला कुरतडल्यामुळं मोठ्या प्रमाणावर रक्तस्त्राव झाल आणि त्यामुळे महिलेचा मृत्यू झाला असा आरोप नातेवाईकांनी केला आहे. या घटनेमुळे सरकारी रुग्णालयातील अस्वच्छता आणि प्रशासनाच्या बेजबाबदारपणाचे वाभाडे निघाले आहेत.

**राजकीय नेत्यांकडून कारवाईची मागणी**

या घटनेचे पडसाद राजकीय वर्तुळातही उमटले आहेत. रुग्णालयातील निष्काळजीपणा पाहून विविध राजकीय पक्षांनी दोषींवर गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आहे. या संदर्भात भाईदर महानगरपालिका रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. जाफर



तडवी यांनी सांगितले की, "या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात आली आहे. संबंधित डॉक्टर आणि परिचारिकांना नोटिसा बजावण्यात आल्या असून चौकशीनंतर कडक कारवाई केली जाईल."

**रुग्णांच्या सुरक्षेवर मोठं प्रश्नचिन्ह**

ज्या विभागाला 'अतिदक्षता विभाग' म्हटले जाते तिथे उंदीर पोहोचतातच कसे? आणि गंभीर स्थितीत असलेल्या रुग्णाची सुरक्षा वाऱ्यावर का सोडली गेली? असे प्रश्न आता विचारले जात आहेत. या घटनेमुळे सर्वसामान्यांच्या मनात सरकारी रुग्णालयांबद्दल भीतीचे वातावरण निर्माण झाले असून माठेकर कुटुंबाने जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

**रुग्णालयात नेमकं काय घडलं?**

सुहासिनी माठेकर (वय 89 वर्षे) असे मृत महिलेचे नाव आहे. प्रकृती खालावल्यामुळे त्यांना 12 मार्च रोजी या रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याने रुग्णालयाच्या चौथ्या मजल्यावरील कउव मध्ये त्यांना व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आले होते. नातेवाईकांच्या दाव्यानुसार, रविवारी मध्यरात्री त्यांच्या उजव्या हाताला उंदराने गंभीररीत्या कुरतडले.

**नातेवाईकांचा गंभीर आरोप**

सोमवारी सकाळी 6:00 वाजताच्या सुमारास नातेवाईक त्यांना भेटण्यासाठी कउव मध्ये गेले, तेव्हा त्यांना हा प्रकार लक्षात आला. वृद्ध महिलेच्या हातावर खोल जखम झाली होती आणि त्यातून मोठ्या प्रमाणात रक्त वाहत होते. नातेवाईकांनी तातडीने डॉक्टरांना विचारणा केली, परंतु उपचारादरम्यान दुपारी या महिलेचा मृत्यू झाला. ₹रात्री कर्तव्यावर असलेले डॉक्टर आणि नर्स काय करत होते? त्यांना ही घटना कशी समजली नाही?₹ असा संतप्त सवाल नातेवाईकांनी उपस्थित केला आहे. जखमेमुळे झालेल्या अतिरिक्तस्त्रावामुळेच त्यांचा बळी गेल्याचा आरोप कुटुंबाने केला आहे.

## वसईत सुरक्षेअभावी अपघात खोदलेल्या खड्ड्यात कार कोसळली



**■वसई। प्रतिनिधी,**

वसई परिसरातील मुंबई-अहमदाबाद महामार्गावर सुरू असलेल्या नाल्याच्या कामामुळे शुक्रवारी 13 मार्च रोजी सकाळी एक अपघात घडला. यदुवंशी ढाब्याजवळ रस्त्याच्या कडेला खोदलेल्या नाल्यात एक कार कोसळली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही, मात्र कारचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या अपघाताचा व्हिडिओ सध्या सोशल मिडियावर व्हायरल होत आहे. वसई हद्दीतील यदुवंशी ढाब्याजवळ मुंबई-अहमदाबाद महामार्गावर शुक्रवारी सकाळी हा अपघात घडला. महामार्गाच्या बाजूला नाल्याचे काम सुरू असून त्या ठिकाणी मोठा खड्डा खोदण्यात आला आहे. त्याच खड्डयात ही कार अचानकपणे कोसळल्याने हा अपघात झाला. खोदकामाच्या ठिकाणी कोणतेही दिशादर्शक फलक किंवा सुरक्षेसाठी बॅरिकेटिंगही करण्यात आलेले नव्हते. त्यामुळे वाहनचालकाला पुढे खोदकाम सुरू असल्याची कल्पना न आल्याने कार थेट या खड्डयात पडली. अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी तातडीने मदत करत कारमधील लोकांना तातडीने बाहेर काढले. या अपघातात सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र कारचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. दरम्यान, महामार्गावर सुरू असलेल्या रास्ते व नाल्याहया कामामुळे या भगत वारंवार वाहतूक कोंडी होत असल्याची तक्रार वाहनचालकांकडून केली जात आहे. अपघात घडूनही योग्य सुरक्षा व्यवस्था न केल्यामुळे संबंधित प्रशासनाच्या निष्काळजीपणावर नागरिकांकडून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. प्रशासनाने तातडीने योग्य बॅरिकेटिंग, दिशादर्शक फलक आणि इतर सुरक्षेच्या उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली आहे. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी त्वरित पावले उचलण्याची गरज स्थानिकांनी व्यक्त केली आहे.

## सिलिंडर तुटवड्याचा सुवर्ण व्यवसायाला फटका

### जळगाव शहरात दररोज सरासरी पाच किलो



**गॅसअभावी मागणी पूर्ण करणे अशक्य**

विशेष म्हणजे सध्या लग्नसराईचा हंगाम सुरू असल्यामुळे दागिन्यांची मागणी वाढली आहे. मात्र गॅसअभावी ही मागणी पूर्ण करणे शक्य होत नसल्याने सुवर्ण व्यवसाय अडचणीत आला आहे. शहरातील अनेक सुवर्ण कारागिरांनी आपले काम तात्पुरते थांबवले आहे. जळगावात जवळपास हजारहून अधिक परप्रांतीय कारागीर दागिने तयार करण्याच्या कामात गुंतलेले आहेत. त्यांची जेवणाची व्यवस्था ज्वेलर्सकडून मेसद्वारे केली जाते. मात्र गॅस टंचाईमुळे जेवण बनवण्यावरही परिणाम होत असल्याने कारागिरांची गैरसोय होत आहे.

**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

इराण-अमेरिका युद्धाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या गॅस टंचाईचे परिणाम आता जळगाव शहरातील विविध उद्योगांवर दिसू लागले आहेत. सुवर्ण व्यवसायासाठी प्रसिद्ध असलेल्या या शहरात गॅस सिलिंडरच्या अभावामुळे सुवर्ण अलंकार घडवणाऱ्या कारागिरांचे काम जवळपास ठप्प झाले आहे.

जळगाव शहराला ह्लसुवर्ण नगरीह्व म्हणून ओळखले जाते. सोन्याच्या दागिन्यांसाठी या शहराची देशभरात ख्याती असून दागिन्यांच्या खरेदीसाठी विविध राज्यांतून ग्राहक येथे येत असतात. जळगाव शहरात दररोज सरासरी पाच किलो सोन्यापासून दागिने तयार केले जातात. मात्र सध्या व्यावसायिक गॅस सिलिंडरचा तुटवडा निर्माण झाल्यामुळे हे उत्पादन मोठ्या प्रमाणात घटले आहे. दागिने तयार करण्यासाठी सोने वितळवणे, दागिने घडवणे तसेच त्यांना अंतिम स्वरूप देण्यासाठी कारागिरांकडून व्यावसायिक गॅस सिलिंडरचा वापर केला जातो. सध्या गॅस उपलब्ध नसल्याने अर्धा किलो सोन्याचे दागिने तयार करणेही कठीण झाले आहे. उपलब्ध गॅस संपल्यानंतर हे काम पूर्णपणे बंद पडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

**१५ ते २० उद्योग गॅसअभावी बंद**

दरम्यान, जळगाव एमआयडीसीतील काही उद्योगांनाही या गॅस टंचाईचा फटका बसला आहे. शहरात कोटिंगचा व्यवसाय करणारे सुमारे १५ ते २० उद्योग गॅसअभावी बंद पडले आहेत. तसेच वेल्डिंग उद्योगालाही याचा परिणाम जाणवत आहे. याशिवाय केटरिंग व्यवसायावरही गॅस टंचाईचे संकट ओढवले आहे. अनेक केटरर्स लहान कार्यक्रमांच्या ऑर्डर्स स्वीकारत असले तरी मोठ्या कार्यक्रमांसाठी ग्राहकांनी स्वतः गॅस सिलिंडर उपलब्ध करून द्यावा, अशी अट घालत असल्याचे चित्र दिसून येत आहे. सिलिंडर तुटवड्याचा सुवर्ण व्यवसायाला फटका; जळगावात दागिने तयार करण्याचे काम ठप्प

जळगाव शहरात दररोज सरासरी पाच किलो सोन्यापासून दागिने तयार केले जातात. मात्र सध्या व्यावसायिक गॅस सिलिंडरचा तुटवडा निर्माण झाल्यामुळे हे उत्पादन मोठ्या प्रमाणात घटले आहे. दागिने तयार करण्यासाठी सोने वितळवणे, दागिने घडवणे तसेच त्यांना अंतिम स्वरूप देण्यासाठी कारागिरांकडून व्यावसायिक गॅस सिलिंडरचा वापर केला जातो.

## पुण्यात आणखी एका वैष्णवीचा बळी, सासरच्या छळाला कंटाळून आत्महत्या

### पतीसह चौघांवर गुन्हा दाखल




**■पुणे। प्रतिनिधी,**

पुण्यातील लोणीकंद परिसरात सासरी होत असलेल्या कथित छळाला कंटाळून विवाहितेने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी पती, सासू, सासरा आणि दिर अशा चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मृत विवाहितेचे नाव वैष्णवी यशवंत लाटे (वय 22) असे असून ती लोनिकांद परिसरातील बकोरी रोडवरील गोकुळ पार्क, फेज-2 येथे पतीसोबत राहत होती. या संदर्भात तिची आई गंगाबाई अशोक जामकर (रा. वडगाव गुंदा, जि. बीड) यांनी तक्रार दाखल केली आहे.

**चौघांविरुद्ध गुन्हा दाखल**

या सततच्या त्रासाला कंटाळून वैष्णवीने 14 मार्च 2026 रोजी सकाळी सुमारे 11:47 वाजता राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे समोर आले आहे. या घटनेची माहिती मिळताच लोणीकंद पोलीस स्टेशनचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा करत मृतदेह पुढील तपासासाठी पाठविण्यात आला असून या प्रकरणी चौघांविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे. घटनेचा पुढील तपास लोणीकंद पोलिसांकडून सुरू आहे.

दरम्यान, लोणीकंद परिसरात विवाहित महिलांवरील छळाच्या घटनांमुळे पुन्हा एकदा चिंता व्यक्त केली जात असून अशा प्रकरणांमध्ये कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

**सासू, सासरा आणि दीराने केला छळ**

तक्रारीनुसार, 7 मे 2025 पासून वैष्णवीला सासरी वारंवार पैशांसाठी त्रास दिला जात असल्याचा आरोप आहे. पती यशवंत शिवनाथ लाटे हा मारहाण करून शिवीगाळ करत आईकडून पैसे आणण्याची मागणी करत असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. तसेच सासू सखुबाई शिवनाथ लाटे, सासरा शिवनाथ महादेव लाटे आणि दिर सुरज शिवनाथ लाटे यांनीही पैशांसाठी तगादा लावत तिचा मानसिक व शारीरिक छळ केल्याचा आरोप आहे.

## मुलीचे अपहरण करून खांबाला बांधलं... 'त्या' कारणावरून नवऱ्यासह सासू-सासऱ्यांच्या अडचणीत वाढ

**■बीड। प्रतिनिधी,**

बीडच्या पिंपळनेर पोलीस ठाणे हद्दीत एका 17 वर्षीय मुलीचे अपहरण करून तिला गावातील एका चावडीत बांधले. या घटनेनं परिसर हादरून गेला आहे. या घटनेनं महाराष्ट्रभरात हळहळ व्यक्त केली जात आहे. 10 मार्चच्या रात्री घडलेल्या घटनेनं संतापाची लाट उसळल्याचे चित्र आहे. या प्रकरणात मोठी घडामोड झाली आहे.

पीडितेचा विवाह हा बालवयात झाल्याची माहिती याच प्रकरणामुळे समोर आली. यामुळे पती, सासू-सासरे आणि तत्कालीन विवाहावेळी जे ग्रामसेवक आणि सरपंच होते त्यांनावर देखीलर कारवाई केली जाणार असल्याचे सांगण्यात येत आहे. याबरोबरच पुढील तपासात पतीच्या विरोधात पोक्सो अंतर्गत गंभीर गुन्हा देखील दाखल होऊ शकतो अशी माहिती बालकल्याण समितीचे अध्यक्ष अशोक तांगडे यांनी दिली.

तसेच याच प्रकरणात पीडितेचा बालविवाह झाल्याने सासू-सासरे, नवरा, तसेच तत्कालीन ग्रामसेवक आणि सरपंच यांच्यावर गुन्हा दाखल केला जाईल याची शक्यता आहे.



बीड जिल्ह्यातील पिंपळनेर पोलीस ठाणे परिसरात माणुसकीला काळिमा फासणारा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. एका अल्पवयीन मुलीला घरातून मध्यरात्री अपहरण करून तिच्यावर अत्याचार केला होता. नंतर तिला गावातील एका सार्वजनिक चावडीवर खांबाला बांधून ठेवण्यात आला होता. ही घटना 10 मार्च रोजी घडल्याचे सांगण्यात येत आहे. नराधमाचं नाव वैभव गिताराम पटेकर याने रात्री तीन वाजता घरात प्रवेश केला. त्याने पीडितेचं तोंड दाबले आणि तिच्यावर बळजबरी केली आणि एका नदी किनारी नेऊन तिच्यावर पाशवी आत्याचार केले होते. यामुळे पीडितेला मानसिक आणि शारीरिक अशा दोन्ही स्तरावर प्रचंड यातना भोगाव्या लागल्या आहेत.

संबंधित आरोपी एवढ्यावरच न थांबता त्याने गावातील एका मध्यभागी असलेल्या चावडीवर आणले, तिथे तिला एका खांबाला बांधून ठेवले होते आणि घटनास्थळावरून पसार झाला होता. पीडिता वेदनेनं व्हिवळत तिथेत पडून होती. अखेर पीडितेनं अन्यायाविरुद्ध आवाज उठवून कुटुंबासह पिंपळनेर गाठून वैभव पटेकरविरुद्ध फिर्याद नोंदवली होती. पोलिसांनी आरोपीवर भारतीय न्यायसंहिता कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. दरम्यान, आरोपीला 17 मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

## 11 व्या वर्षी बलात्कार, 12 व्या वर्षी लग्न, 13 व्या वर्षी बनली आई

### तीन वर्षानंतर 'असं' बाहेर आलं प्रकरण

**■मुंबई। प्रतिनिधी,**

चित्रपटात शोभावी पण वास्तवात अंगावर काटा आणणारी एक संतापजनक घटना समोर आली आहे. एप्रिल 2022 मध्ये हसनपुर येथील एका 11 वर्षीय बालिकेवर शेजारील तरुणाने बलात्कार केला होता. याप्रकरणी पीडितेच्या वडिलांच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपीची रवानगी तुरुंगात केली होती. मात्र, काही काळानंतर आरोपी जामिनावर बाहेर आला आणि तिथूनच या प्रकरणाला वेगळे वळण मिळाले. उत्तर प्रदेशातील अमरोहा जिल्ह्यातील ही घटना आहे.

**पंचायतीचा अजब न्याय आणि पैशांचा व्यवहार**

न्याय मिळवून देण्याऐवजी 2023 मध्ये दोन्ही पक्षांमध्ये पंचायत बसवण्यात आली. अज्ञान आणि लालसेपोटी पीडितेच्या वडिलांनी 6 लाख रुपये घेऊन आपल्या 12 वर्षांच्या मुलीचा निकाह त्याच नराधमाशी लावून दिला. हे 6 लाख रुपये आरोपीच्या एका नातेवाईकाने दिले होते. विशेष म्हणजे, या संपूर्ण बेकायदेशीर व्यवहारापासून पोलीस अनभिज्ञ राहिले.

**13 व्या वर्षी मातृत्व आणि नातेवाईकाचा सूड**

निकाहानंतर अवघ्या एका वर्षात, म्हणजेच 2024 मध्ये, ही 13 वर्षांची अल्पवयीन मुलगी एका मुलीची आई बनली. सध्या ती स्वतः लहान असूनही आपल्या दोन वर्षांच्या मुलीचा सांभाळ करत आहे. दरम्यान, ज्या नातेवाईकाने 6 लाख रुपये दिले होते, ते आरोपी परत करू शकला नाही. या पैशांच्या वादातून संतापलेल्या त्या नातेवाईकाने जानेवारी 2026 मध्ये बाल कल्याण समितीकडे तक्रार केली आणि या प्रकरणाचा पदार्फाश झाला.

## कीर्तनकार 'महाराजा'चा अल्पवयीन मुलीवर अमानुष अत्याचार, लोखंडी पकडीने चटके दिले

**■अहिल्यानगर । प्रतिनिधी,**

पारनेर तालुक्यातील ढवळपुरी येथे अध्यात्म आणि संस्काराचे धडे देणाऱ्या वारकरी संप्रदायाला काळिमा फासणारी एक अत्यंत संतापजनक घटना उघडकीस आली आहे. श्री दुर्गादेवी वारकरी शिक्षण संस्थेचा अध्यक्ष आणि कीर्तनकार यशवंत एकनाथ थोरात





उर्फ अण्णासाहेब गुंजाळ महाराज याने एका 17 वर्षीय अल्पवयीन मुलीवर मागील पाच वर्षांपासून धाक दाखवून वारंवार अत्याचार केल्याचा खळबळजनक प्रकार समोर आला असून पीडितेच्या तक्रारीनंतर पारनेर पोलिसांनी नराधम आरोपीला अटक केली आहे.

**कुटुंबाला जीवे मारण्याची धमकी देऊन अनेकदा अत्याचार**

मिळालेल्या माहितीनुसार पीडित मुलगी इयत्ता आठवीत असल्यापासून हा प्रकार सुरू होता आणि आरोपी यशवंत थोरात हा पीडितेच्या शेजारीच राहत असल्याने दोन्ही कुटुंबांचे घरोब्याचे संबंध होते. याचाच गैरफायदा घेऊन आरोपीने पीडितेवर वाईट नजर ठेवली होती आणि मुलगी घरी एकटी असताना त्याने वारंवार तिच्यावर बळजबरीने शरीरसंबंध प्रस्थापित केले होते. पीडितेने या कृत्याला विरोध करण्याचा प्रयत्न केला असता आरोपीने तिला व तिच्या कुटुंबाला जीवे मारण्याची धमकी देऊन दहशत निर्माण केली होती.

**बांबूने बेदम मारहाण, लोखंडी पक्कड गरम करुन दिले चटके**

या घटनेचा थरार 10 मार्च 2026 रोजी शिगेला पोहोचला जेव्हा आरोपीने पीडितेला फोन करून स्वतःच्या घरी बोलावले आणि तिने येण्यास नकार दिला असता कुटुंबाला संपवण्याची धमकी दिली. भीतीपोटी पीडिता तिथे गेली असता आरोपीने तिला कॉम्प्युटर रूममध्ये नेऊन बांबूने बेदम मारहाण केली आणि गॅसवर गरम केलेली लोखंडी पक्कड लावून तिला अमानुष चटके दिले. या अमानुष मारहाणीनंतरही त्याने तिच्यावर बळजबरीने अत्याचार केला असून या छळामुळे पीडितेला चालणेही कठीण झाले होते.


गंभीर अवस्थेत असलेल्या पीडितेने 14 मार्च रोजी भावाकडे सर्व आपबिती कथन केल्यानंतर याप्रकरणी पारनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी तातडीने सूत्रे हलवत आरोपी यशवंत थोरात याला 15 मार्च रोजी पहाटे राहत्या घरातून अटक केली असून न्यायालयाने त्याला 20 मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. या घटनेमुळे संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्यात संतापाची लाट उसळली असून भोंदू महाराजावर कठोर कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे.



## संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# झोपडपट्टीमुक्त दिवास्वप्न



राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात मुंबईकरांच्या अत्यंत जिव्हाळ्याच्या प्रश्नावर नुकतीच चर्चा झाली. चर्चेचा विषय होता झोपडपट्ट्यांच्या पुनर्विकासासंबंधीचा. आजघडीला मुंबई शहर आणि उपनगरं नगरविकासाच्या एका मोठ्या संक्रमणावस्थेतून जात आहेत. कुणीही 360 अंशांच्या कोनात मान वळवून बघितले, तर त्याला शहराच्या प्रत्येक कोपऱ्यात कुठे ना कुठे पुनर्विकासाची कामे सुरू असलेली दिसून येतील. मग हा पुनर्विकास झोपडपट्ट्यांचा असो, जुन्या चाळी-वसाहती, इमारतींचा असो किंवा पायाभूत सुविधा प्रकल्पांचा असो. सर्वत्र सिमेंट-काँक्रिटची कामेच कामे सुरू असलेली दिसून येतील. त्यातही मुंबई शहर-उपनगरात झोपडपट्ट्यांचा पुनर्विकास हा मागच्या काही दशकांपासून कळीचा मुद्दा ठरलेला आहे. गुरुवारी विधान परिषदेत शिवसेना ठाकरे पक्षाचे सदस्य सुनील प्रभू यांनी झोपडपट्टी पुनर्विकास योजनेअंतर्गत वरच्या मजल्यावर राहणाऱ्या झोपडीधारकांना पात्र ठरविण्याबाबतचा प्रश्न विचारला होता. त्यावर प्रभारी मंत्री शंभूराज देसाई यांनी उत्तर देत राज्यातील झोपडपट्टी क्षेत्र सुधारण्याच्या संदर्भातील अधिनियमातील तरतुदी स्पष्ट केल्या. खरे तर या प्रश्नाला नगरविकास आणि गृहनिर्माणमंत्री एकनाथ शिंदे यांनी उत्तर देणे अपेक्षित होते. परंतु, मागच्या दीड वर्षांत बहुतेक विधिमंडळ अधिवेशनात एकनाथ शिंदे यांच्याऐवजी प्रभारी मंत्रीच प्रश्नोत्तराच्या तासात त्यांच्या खात्याची उत्तरे देत असतात. याला शिंदेंना आपल्याकडील खात्यांबाबत असलेली नाराजी म्हणावे किंवा अनास्था हे त्यांचे त्यांनाच ठावूक. असो. तर, सुनील प्रभू यांनी विचारलेल्या प्रश्नावर उत्तर देताना केवळ तळमजल्यावरील झोपड्यांनाच पुनर्विकासाचा लाभ देण्याची कायद्यात तरतूद असल्याने पहिल्या किंवा दुसऱ्या मजल्यावरील तसेच पोटमाळ्यावरील झोपड्यांचा पुनर्विकासात समावेश करता येणार नसल्याचे शंभूराज देसाई यांनी सांगितले. कुठल्या झोपड्यांचा पुनर्विकासात समावेश करता येईल, याची स्पष्ट व्याख्या यासंबंधीच्या कायद्यात करण्यात आलेली आहे. त्या व्याख्येनुसार जमिनीशी प्रत्यक्ष जोडलेली झोपडी किंवा बांधकामच पुनर्विकासाअंतर्गत ग्राह्य धरले जाते. हे खरे असले तरी, वास्तव याच्या अगदी उलटे आहे. मुळात कुठलीही झोपडी ही आठ बाय दहा, दहा बाय दहा किंवा अशाच प्रकारे लहानमोठ्या आकारमानाची असते. एखादे कुटुंब काही वर्षांपूर्वी संबंधित ठिकाणी झोपडी उभारून राहू लागल्यानंतर मध्यंतरीच्या काळात त्याचे कुटुंबही वाढते. वाढत्या कुटुंबाला जागा कमी पडू लागताच झोपडीधारकाला नाईलाजाने या पात्र झोपडीवर पहिल्या किंवा दुसऱ्या मजल्याचे बांधकाम करावेच लागते. त्यानंतर या मजल्यावर त्यांचे कुटुंब व काही वेळा नातेवाईक, भाडेकरू राहू लागतात. झोपडीधारकाच्या जागाविस्ताराला मर्यादा असल्यानेच त्यालाही इमारतींच्या बांधकामाप्रमाणे आकाशाच्या दिशेने बांधकाम करावे लागते. आजघडीला शहरातील कुठल्याही झोपडपट्टीतून फेरफटका मारल्यास बहुतांश ठिकाणी झोपडीवर एक किंवा दोन मजले हमखास चढलेले दिसून येतात. वांद्रे पूर्वेकडील रेल्वे स्थानकाला लागून असलेल्या झोपडपट्टीत तर झोपडीवर झोपडी अशा रितीने आठ ते दहा मजल्यांच्या झोपड्यांच्या इमारती उभ्या राहिलेल्या दिसून येतील. या झोपड्यांमध्ये राहण्यापासून ते लहानमोठ्या उद्योगधंद्यांपर्यंत सर्वकाही बिनदिक्कतपणे चालते. मागच्या अनेक वर्षांपासून या झोपड्या आहे तिथेच उभ्या आहेत. अगदी सुरुवातीच्या टप्प्यात म्हणजे जेव्हा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत झोपडपट्ट्यांच्या निर्मूलनाचे काम सुरू झाले तेव्हा 1995 सालापर्यंतच्याच झोपड्या पुनर्विकासासाठी पात्र ठरत होत्या. कालांतराने राज्य सरकारने कायद्यात बदल करून २००० सालापर्यंतच्या झोपड्या पात्र करून घेतल्या. परंतु, पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत केवळ २००० पर्यंतच्याच झोपड्यांना संरक्षण मिळत असल्याने पुनर्विकासासाठी केवळ ३० टक्केच झोपड्या पात्र ठरत होत्या. म्हणून राज्य सरकारने नव्याने कायदा करत 2011 पर्यंतच्या झोपड्याही अधिकृत करून घेतल्या. वेळोवेळी वाढवलेल्या या मुदतीमागे अर्थातच त्या त्या वेळच्या राजकारणाचाही भाग होता. 1995 पासून मागच्या 30 वर्षांमध्ये केवळ मुंबई शहरच नाही तर मुंबईची उपनगरे, ठाणे, पालघर, रायगड, पुणे, नाशिक, नागपूर, सोलापूर-कोल्हापूर आदी जिल्ह्यातही मोठ्या संख्येने झोपडपट्ट्या तयार झाल्यात. या झोपड्यांमध्ये स्थानिकांसह परप्रांतीयांचा मोठा भरणा झाला आहे. एसआरए योजनेंतर्गत फुकट घरे मिळणार असली, तर सोडणार कोण? या फुकटच्या घरांच्या मानसिकतेतूनच मागच्या 30 वर्षांत कुत्र्याच्या छत्र्यांप्रमाणे सरकारी, निमसरकारी व खासगी जमिनींवर जागोजागी झोपडपट्ट्या उभ्या राहिल्या. अनेक कायदेशीर, तांत्रिक अडचणींवर मात करून या झोपडपट्ट्यांच्या पुनर्विकासाचे प्रयत्न केले जात असूनही आजपर्यंत ही समस्या निकाली लागलेली नाही. झोपडपट्ट्या, जुने कोळीवाडे यांच्या पुनर्विकासासंदर्भात एक ना अनेक समस्या आहेत. केवळ जमिनीला लागून असलेली झोपडीच पात्र ठरणार असेल तर वरच्या मजल्यावर राहणाऱ्या आमच्या मुलामुलींनी कुठे जायचे, शहराबाहेर हद्दपार व्हायचे का? असे प्रश्नही झोपडीधारक विचारतात. त्यातून पुढे झोपडीधारक आणि बिल्डरांमध्येही वाद होतात. बिल्डरांना नफा मिळणार नसेल तर ते तरी प्रकल्प हाती कशाला घेणार. सध्या झोपडपट्टी पुनर्विकासात पात्र झोपडीधारकाला 300 चौ. फू. कार्पेट क्षेत्रफळाचे घर मिळते. या घराचे आकारमान वाढवून किंवा पहिल्या-दुसऱ्या मजल्याची भरपाई देवून प्रश्न निकाली काढता येऊ शकेल. त्यासाठी बिल्डरांनाही अतिरिक्त एफएसआय देता येऊ शकेल. झोपडपट्टीमुक्त शहराचे उद्दिष्ट साध्य करायचे असल्यास या नियमात सुधारणा करणे गरजेचे असल्याचे मत विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी व्यक्त केले. मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्र्यांनी वस्तुस्थिती समजून घेत या प्रकरणात तोडगा काढल्यास लाखो झोपडीधारकांना दिलासा मिळू शकेल. खरे तर त्या त्या शहरातील किंवा परिसरातील झोपडीधारकांच्या गरजा समजून घेत प्रकल्प राबविल्यास पुनर्विकास विनाअडथळा व लवकरात लवकर मार्गी लागू शकेल. अन्यथा झोपडपट्टीमुक्त शहराचे उद्दिष्ट दिवास्वप्नच ठरेल.

# एसटीला लागलेले 'ग्रहण'

राज्यातील वाढत्या अवैध प्रवासी वाहतुकीच्या पार्श्वभूमीवर राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी एक मार्चपासून राज्यभर कठोर कारवाई करण्याचा आदेश संबंधित यंत्रणांना दिला आहे. या निर्णयामुळे अवैध प्रवासी वाहतुकीचा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. एक मार्च पासूनचा गेल्या सुमारे पंधरवड्याचा आढावा घेतला तर काय दिसते? तर, या बाबतीत वाहतूक पोलिस, आरटीओ व एसटी या तिन्ही विभागांनी कुठलेही फारसे नियोजन न करता किंवा कुठलेही परिपत्रक न काढता देखील निव्वळ एका बैठकीमुळे व शासनाच्या प्रसिद्धीपत्रकामुळे मोठी फलनिष्पत्ती दिसून आली आहे. या पंधरवड्यात एसटीचे उत्पन्न वाढल्याचे दिसते आहे. याचाच अर्थ अवैध वाहतूक हेच एसटीला लागलेले ग्रहण आहे. या समस्येचा संबंधित यंत्रणांनी नीट प्रतिकार केला तर एसटीला लागलेले हे ग्रहण सुटून चित्र बदलल्याशिवाय राहणार नाही.

अवैध वाहतूक या समस्येचे गांभीर्य लक्षात घेण्याआधी सर्वप्रथम 'अवैध प्रवासी वाहतूक' म्हणजे नेमके काय, हे समजून घेणे आवश्यक आहे.

अवैध प्रवासी वाहतूक म्हणजे सरकारने ठरवलेल्या कायद्यांनुसार आवश्यक परवाना (परमिट), नोंदणी किंवा अधिकृत परवानगी न घेता प्रवाशांची वाहतूक करणे होय. आपल्या देशात ही बाब प्रामुख्याने मोटर वाहन अधिनियम , १९८८ अंतर्गत येते. या कायद्यानुसार कोणत्याही वाहनाने पैसे घेऊन प्रवाशांची वाहतूक करायची असल्यास त्यासाठी विशिष्ट परवाना, मार्ग परवाना (रूट परमिट); तसेच इतर आवश्यक कागदपत्रे, परवानग्या असणे बंधनकारक असते. मात्र, प्रत्यक्षात अनेक ठिकाणी या नियमांकडे दुर्लक्ष करून प्रवासी वाहतूक सुरू असल्याचे दिसून येते. अशा प्रकारच्या अवैध प्रवासी वाहतुकीची अनेक उदाहरणे राज्यभर आढळतात. खासगी कार, जीप किंवा दुचाकीवर पैसे घेऊन प्रवाशांची ने-आण करणे, परवानगी नसताना शेअरिंग रिक्षा किंवा कार चालवणे, परवाना नसताना ऑनलाइन प किंवा बाईक टॅक्सीच्या माध्यमातून प्रवासी वाहतूक करणे, परमिटने मंजूर केलेल्या क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी वाहनात बसवणे किंवा ठरलेल्या मार्गाबाहेर प्रवासी वाहतूक करणे ही त्याची प्रमुख उदाहरणे आहेत. अशा प्रकारच्या वाहतुकीमुळे वाहतूक व्यवस्थेतील शिस्त ढासळते आणि नियमांचे उल्लंघन मोठ्या प्रमाणावर होते.

मोटर वाहन अधिनियमातील तरतुदीनुसार अवैध प्रवासी वाहतूक हा गंभीर गुन्हा मानला जातो. अशा प्रकरणांमध्ये संबंधित वाहनावर दंड आकारणे, वाहन जप्त करणे, चालकाचा परवाना निलंबित किंवा रद्द करणे अशा कारवाया केल्या जाऊ शकतात. मोटर वाहन अधिनियमातील कलम ६६ आणि १९२अ अंतर्गत अशा गुन्ह्यांची नोंद केली जाते.

प्रश्न असा निर्माण होतो, की शासनाला या अवैध प्रवासी वाहतुकीवर कारवाई करण्याची गरज का भासली, याचे उत्तर राज्यातील सध्याच्या परिस्थितीत दडलेले आहे. गेल्या काही वर्षांत अवैध प्रवासी वाहतूक मोठ्या प्रमाणात वाढल्याचे दिसून येत आहे.

ग्रामीण भागात साधारणपणे ४० ते ६० किलोमीटर अंतरावर जीप, टेम्पो किंवा सहा आसनी



रिक्षांच्या माध्यमातून प्रवाशांची अवैध रीतीने टप्पे वाहतूक केली जाते. ग्रामीण भाषेत काही ठिकाणी याला 'वडाप' तर काही ठिकाणी 'काळी-पिवळी' असे संबोधले जाते.

अनेकदा संबंधित वाहन धारकांकडे त्यासाठीचा योग्य, आवश्यक परवाना नसतो, वाहनात क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी बसवले जातात. भरधाव धावणारी ही वाहने अनेकदा अपघाताला निमंत्रण देतात. मागील महिन्यात विदर्भातील वडूर-राजुरा बाजार मार्गावर तीन आसनी रिक्षाचा अपघात झाला. या अपघातात पाच जणांचा जागीच मृत्यू झाला. या रिक्षामध्ये अवैधरीत्या सात प्रवासी प्रवास करत होते. अशा प्रकारे क्षमतेपेक्षा अधिक संख्येने प्रवासी घेऊन जाणारी वाहने प्रवाशांच्या जीवाला धोका निर्माण करतात. दुर्दैवाने अशा वाहनांमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना अपघातानंतर विम्याची मदतही मिळत नाही.

ट्रॅव्हल्स कंपन्यांची मक्तेदारी

एसटीसारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेतील काही उणिवांचा फायदा घेत राज्यभरात ट्रॅव्हल्स कंपन्यांचे जाळे मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. उच्च मध्यमवर्गीय प्रवाशांना त्यांच्या सोयीप्रमाणे सेवा देणाऱ्या या ट्रॅव्हल्स कंपन्या अनेकदा परिवहन विभागाचे नियम धाब्यावर बसवून प्रवासी वाहतूक करत असल्याचे दिसते.

टप्पा वाहतुकीसाठी कोणतीही परवानगी नसताना अनेक ट्रॅव्हल्स कंपन्या मागार्तील विविध ठिकाणी प्रवाशांची अवैधरीत्या वाहतूक करतात. खासगी वाहतूक करणारे चालक मद्यपान करून वाहन चालवीत असल्या संदभार्तील तक्रारीही वारंवार समोर येत असतात. इतकेच नव्हे; तर ४० आसनी बसमध्ये कोणतीही अधिकृत परवानगी न घेता बदल करून ५५ ते ६० आसनांची क्षमता निर्माण केली जाते. सोबत, वाहनाच्या डिक्कीतून अवैधरीत्या मालवाहतूकही केली जाते. अनेकदा हे सर्व प्रकार प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे सुरू असल्याची चर्चा होते.

अलीकडच्या काळात कार पूलिंग या संकल्पनेने सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेसमोर एक नवे आव्हान उभे केले आहे. या प्रकारात अनेक कारचालक प्रवासी वाहतुकीचा कोणताही परवाना नसतानाही विशिष्ट मोबाइल पच्या माध्यमातून प्रवासी गोळा करतात आणि कमी दरात ठरावीक ठिकाणी नेण्याची सुविधा देतात. मुंबई-पुणे मार्गावर हा प्रकार मोठ्या प्रमाणात वाढला असून त्याचा फटका एसटीच्या शिवनेरीसारख्या प्रस्थापित बससेवेला देखील बसत असल्याचे दिसून येते. परवाना, विमा, फिटनेस आणि इतर आवश्यक अशा नियमांचे पालन न करता वाहतूक केल्यामुळे प्रवाशांच्या सुरक्षिततेला गंभीर धोका निर्माण होतो. अपघाताच्या प्रसंगी अशा वाहनांमधील प्रवाशांना कोणतीही कायदेशीर सुरक्षा मिळत नाही, ही अत्यंत चिंताजनक बाब आहे.

याशिवाय अवैध वाहतुकीमुळे शासनाच्या महसुलावरही परिणाम होत असतो. अधिकृत परवाने, कर आणि शुल्क न भरता वाहतूक केल्यामुळे शासनाला मोठ्या प्रमाणात आर्थिक तोटा सहन करावा लागतो. त्याचबरोबर एसटी महामंडळ, अधिकृत टॅक्सी, रिक्षा आणि इतर कायदेशीर वाहतूकदारांना याचा फटका बसतो. नियमांचे पालन करून व्यवसाय करणाऱ्या या घटकांपुढे अवैध वाहतुकीमुळे अन्यायकारक स्पर्धा निर्माण होते. अवैध प्रवासी वाहतुकीचा आणखी एक गंभीर परिणाम म्हणजे वाहतूक कोंडी आणि कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न. कोणत्याही नियंत्रणाशिवाय रस्त्यावर उतरलेली वाहने शहरांमध्ये गोंधळ आणि वाहतूक कोंडी वाढवतात. त्यामुळे संपूर्ण वाहतूक व्यवस्थेवर ताण निर्माण होतो.

या सर्व पार्श्वभूमीवर अवैध प्रवासी वाहतुकीवर कठोर कारवाई करणे ही काळाची गरज बनली आहे. सरकारने हाती घेतलेली कारवाई ही केवळ दंडात्मक नसून सुरक्षित, शिस्तबद्ध आणि पारदर्शक वाहतूक व्यवस्था निर्माण करण्याच्या दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल आहे, असे म्हणता येईल. सार्वजनिक प्रवासी वाहतूक व्यवस्था मजबूत राहण्यासाठी नियमांचे काटेकोर पालन होणे अत्यावश्यक आहे. म्हणूनच अवैध प्रवासी वाहतुकीला आळा घालण्यासाठी प्रशासनाने कठोर पावले उचलणे आणि नागरिकांनीही कायद्याचे पालन करणे निकडीचे आहे. सुरक्षित आणि विश्वासार्ह सार्वजनिक वाहतूक व्यवस्था टिकवून ठेवण्यासाठी ही जबाबदारी शासनासोबत समाजाचीही आहे. अवैध प्रवासी वाहतुकीचे हे वाढते सावट दूर करूनच राज्यातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला लागलेले हे ग्रहण दूर होऊ शकते, अशी खात्री वाटते.

# लिबियाने करून दाखवलं, ते महाराष्ट्रही करणार !

मानवाने अनेक अशक्य गोष्टी शक्य करून दाखवल्या आहेत. विज्ञान अन् तंत्रज्ञानाच्या जोरावर प्रतिकूलतेतून अनुकूलता निर्माण केली आहे. महाराष्ट्रातदेखील अनेक भागात दुष्काळसदृश्य परिस्थिती पाहायला मिळते. याच नैसर्गिक संकटावर मात करण्यासाठी सरकारकडून नदीजोड आणि सिंचनासारख्या प्रकल्पांवर काम केले जात आहे. महाराष्ट्रात लिबियासारखा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबविला जाणार आहे. कृष्णा-पंचगंगा नदीचे पाणी मराठवाड्यात नेले जाणार आहे. हे पाणी शंभर किलोमीटर बोगद्यातून गुरुत्वाकर्षणाच्या सहाय्याने उजनी धरणात वळविण्यात येणार आहे.



राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकताच महाराष्ट्र राज्याचा अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पात नदीजोड आणि खोरे जोड प्रकल्पांना विशेष महत्त्व दिले. भविष्यातील पाण्याची गरज बघता हे प्रकल्प नक्कीच फायदेशीर आहेत. सध्या महाराष्ट्रात अनेक जिल्हे अजूनही दुष्काळी आहेत. काही तालुके अजूनही सिंचनाच्या प्रतिक्षेत आहेत. तर काही गावांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी मैलोनमैल वणवण भटकावे लागत आहे. तर दुसरीकडे काही जिल्ह्यांना दरवर्षी पुराचा फटका बसत आहे. हजारो टीएमसी पाणी हे नद्या नाले गटारातून वाहत जाऊन समुद्राला मिळत आहे. हाच असमतोल भरून काढण्यासाठी आणि भविष्यातील पाण्याची गरज भागवण्यासाठी सरकारने नदीजोड प्रकल्पांना प्राधान्य दिले आहे.

नदीजोड प्रकल्प हा ऐकायला जितका सोपा वाटत असला तरी तितकाच तो आव्हानात्मक आहे. भारताच्या बाबतीत बोलायचं झालं तर नदीजोड प्रकल्पाची संकल्पना तशी नवीन नाही. भारतात ही संकल्पना पहिल्यांदा मांडली ती ब्रिटिश इंजिनिअर सर आर्थर कॉटन यांनी. सर आर्थर कॉटन यांनी 1850 च्या दशकात दक्षिण भारतातील मुख्य नद्या जसे की गोदावरी आणि कृष्णा नदी जोडण्याचा प्रस्ताव मांडला. हा प्रस्ताव प्रामुख्याने दुष्काळ निवारण, सिंचन आणि जलवाहतुकीद्वारे मालाची आयात-निर्यात जलद करणे यासाठी होता.

पुढे हीच संकल्पना दिवंगत माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांनीही अंमलात आणण्याचा प्रयत्न केला. देशभरातील दुष्काळ आणि अवर्षणासारख्या नैसर्गिक संकटांना तोंड देण्यासाठी 2002 मध्ये वाजपेयींनी नदीजोड प्रकल्पाची योजना आखली. या प्रकल्पावर समितीने शिक्कामोर्तबही केले, पण संसदेत मंजुरी मिळण्यापूर्वीच निसर्गप्रेमींकडून याला कडाडून विरोध झाला. त्यामुळे योजना थांबली अन् मागे पडली. अखेर 2014 मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी सत्तेत येताच ही योजना मंजूर झाली आणि हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेण्यात आला. दुष्काळाचं सावट दूर करण्यासाठी 2014 मध्ये सरकारने यावर अंमलबजावणी सुरू केली. पहिल्या टप्प्यात केन-बेतवा या दोन नद्या जोडल्या गेल्या. सध्या भारतात अनेक राज्यात या प्रकल्पावर वेगाने काम केले जात आहे.

जगात चीन, अमेरिका, रशिया आणि कॅनडा या देशांनी नदीजोड प्रकल्प यशस्वीपणे राबविला आहे. चीनचा दक्षिण-उत्तर पाणी हस्तांतरण प्रकल्प जगातील सर्वात मोठा प्रकल्प आहे. लिबियासारख्या आखाती देशानेही या प्रकल्पावर एकेकाळी काम केले आहे. खरं तर नैसर्गिकरित्या नदी नसतानाही हा प्रकल्प लिबियाने करण्याचे धाडस केले. अर्थात हा नदीजोड प्रकल्प नव्हता तर हा 'मानवनिर्मित नदी' तयार करण्याचा प्रकल्प होता. या प्रकल्पाचा मुख्य उद्देश लिबियाची तहान भागवणे हा होता.

लिबियाचा 99 टक्के भाग वाळवंटाने व्यापलेला आहे. उष्णता इतकी भयानक आहे की जमिनीवर पडलेल्या पाण्याचे लगेचच बाष्पीभवन होते. लिबियाच्या अनेक भागात 10-10 वर्षे पाऊस पडत नाही. कच्च्या तेलाच्या बाबतीत, लिबियामध्ये अमेरिकेपेक्षा जास्त तेलाचे साठे आहेत, परंतु गोड्या पाण्याच्या बाबतीत, येथे एकही नैसर्गिक नदी नाही. अशा भीषण पाणी टंचाई असलेल्या देशात खनिज तेलाचा शोध घेत असताना मोठा खजिना सापडतो. तो खजिना असतो पाण्याचा. 1950 मध्ये लिबियामध्ये तेलाचा शोध सुरू होता, त्याचवेळी खोदकाम करताना भूगभार्तील गोड्या पाण्याचा साठा सापडला. तहानलेल्या देशासाठी हा एकप्रकारे खजिनाच होता. त्यावेळी लिबियावर राज्य करणाऱ्या मुअम्मर गद्दाफी यांनी हे पाणी लिबियाच्या उत्तरेला वसलेल्या शहरांमध्ये घेऊन जाण्याचा निर्णय घेतला. हे पाणी वाहून नेणे सोपे नव्हते, कारण पाणी दक्षिणेला होते आणि वाहून उत्तरेला न्यायचे होते. हे अंतर 2820 किमी इतके होते. तरी मुअम्मर गद्दाफी यांनी या खर्चिक आणि अवघड प्रकल्पाला 1980 ला हात घातला.

सुरुवातीला कृत्रिम नदीच्या माध्यमातून पाणी वाहून नेण्यावर विचार केला गेला. मात्र भयानक उष्णता असल्याने पाण्याचे बाष्पीभवन होण्याची भीती होती. त्यामुळे हा प्रकल्प बंद पाईपलाईनच्या माध्यमातून करण्याचे ठरवले. प्रकल्पासाठी इतकी आव्हानं होती की सुरुवातीला पाईप बनवण्याचे कारखाने उभे केले गेले. कारखाने उभे करतानाच रस्त्यांची देखील निर्मिती केली. काँक्रीट आणि स्टील वापरून 13 फूट व्यासाचे आणि 8 टन वजनाचे 5 लाख पाईप बनवण्यास सुरूवात झाली. प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यासाठी 5 अरब डॉलर खर्च करण्यात आले. या प्रकल्पाची गिनीज बूक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद करण्यात आली. ही मानवाने बनवलेली पहिली नदी होती. 1889 मध्ये प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यात जबल हसुना ते लिबियाची राजधानी ट्रीपोलीला पाईपलाईनद्वारे जोडले गेले. हे अंतर सुमारे 700 किलोमीटर इतके होते.

तिसऱ्या टप्प्यात कुफ्रा येथून पाणी बेनघाझी या शहराला वाहून नेण्यात आले हे अंतर तब्बल 1000 किमी होते. ही मानवाने तयार केलेली पहिली मानवनिर्मित नदी होती. लिबियासाठी ही नदी जीवनदायिनी होती. हा जगातला सर्वात मोठा सिंचन प्रकल्पदेखील होता. हे पाणी केवळ पिण्यासाठी नाही तर शेतीसाठी आणि कारखानदारीसाठी वापरले जाऊ लागले. या प्रकल्पासाठी 28 बिलियन डॉलर खर्च आला. विशेष म्हणजे अन्य कोणत्याही देशाची मदत न घेता लिबियाने हा प्रकल्प वेळेत अन स्वतःच्या हिमतीवर पूर्ण केला. 2011 मध्ये लिबियामध्ये गृहयुद्ध सुरू झाले. या युद्धातच मुअम्मर गद्दाफी हे महत्त्वाकांक्षी नेते मारले गेले. त्यानंतर नाटोने केलेल्या हल्ल्यात पाईप निर्मितीचे कारखाने उडवण्यात आले. या गृहकलहात प्रकल्पाचा टप्पा 4 आणि 5 ठप्प झाला. तसेच ज्या भागांना पाईपलाईनद्वारे पाणी पुरवले गेले होते त्याभागातला पाणीपुरवठादेखील विस्कळीत झाला. खरं तर लिबियाने जे करून दाखवले ते जगानेदेखील आठवं आश्चर्य म्हणून पाहिलं. मुअम्मर गद्दाफी हे स्वतः या प्रकल्पाबाबत बोलताना हा प्रकल्प म्हणजे जगातलं आठवं आश्चर्य आहे असे सांगत.

मानवाने अनेक अशक्य गोष्टी शक्य करून दाखवल्या आहेत. विज्ञान अन् तंत्रज्ञानाच्या जोरावर प्रतिकूलतेतून अनुकूलता निर्माण केली आहे. महाराष्ट्रातदेखील अनेक भागात दुष्काळसदृश्य परिस्थिती पाहायला मिळते. याच नैसर्गिक संकटावर मात करण्यासाठी सरकारकडून नदीजोड आणि सिंचनासारख्या प्रकल्पांवर काम केले जात आहे. महाराष्ट्रातही लिबियासारखा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबविला जाणार आहे. कृष्णा-पंचगंगा नदीचे पाणी मराठवाड्यात नेले जाणार आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील कृष्णा आणि पंचगंगा नद्यांना दरवर्षी पूरजन्य परिस्थिती निर्माण होते. जवळपास 40 टीएमसी पाणी हे समुद्रात वाहून जाते. हेच पाणी शंभर किलोमीटर बोगद्यातून गुरुत्वाकर्षणाच्या सहाय्याने उजनी धरणात वळविण्यात येणार आहे. उल्हास खोऱ्यातील पाणीही दुष्काळग्रस्त मराठवाड्याकडे वळवले जाणार आहे. याच पार्श्वभूमीवर अर्थसंकल्पात नदीजोड प्रकल्पांना मोठे प्राधान्य देण्यात आले आहे. यासाठी जवळपास 1 लाख 20 हजार 383 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

पाणी हे पृथ्वीतलावरील प्रत्येक सजीवाचे जीवन आहे. पृथ्वीवर एकूण पाण्याच्या साठ्यापैकी साधारणपणे 2.5 टक्के पाणी हे गोडे पाणी आहे. मात्र, यातील बराचसा भाग हिमनद्या आणि बर्फाच्या रूपात साठलेला असल्याने, मानवी वापरासाठी प्रत्यक्षात 1 टक्क्यापेक्षाही कमी पाणी उपलब्ध आहे. जगातील सुमारे 2.2 अब्ज लोक अजूनही सुरक्षित पिण्याच्या पाण्यापासून वंचित आहेत. युनायटेड नेशन्सच्या 2025 च्या अहवालानुसार, हवामान बदलामुळे हिमनद्या वेगाने वितळत असल्याने जगातील गोड्या पाण्याचे स्त्रोत संकटात आहेत. सध्या जगातील निम्म्या लोकसंख्येला पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. संयुक्त राष्ट्रांनी 2026 च्या अहवालात 'जागतिक जल दिवाळखोरी' असा उल्लेख केला आहे. अहवालानुसार, मानवाकडून पाण्याचा वापर निसर्गाच्या पुनर्भरण क्षमतेपेक्षा कितीतरी अधिक वेगाने होत आहे. यामुळे अनेक देश पाणी दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर आहेत. जगभरातील 2.1 अब्ज लोकांना आजही सुरक्षित पिण्याचे पाणी मिळत नाही. त्यामुळे येत्या काळात पाण्याचे संवर्धन करणे, वाहून जाणारे पाणी अडवणे आणि दुष्काळी भागापर्यंत हेच पाणी वाहून नेणे, अशा ठोस उपाययोजनांवर प्रत्येक राष्ट्राला काम करावे लागणार आहे. महाराष्ट्रानेही याच पाणी संवर्धनाच्या मोहिमेत आघाडी घेतली आहे. पाण्यापासून वंचित असणाऱ्या अनेक जिल्ह्यांना सुजलाम सुफलाम करण्याचा निर्धार केला आहे. त्यामुळे हा केवळ एक निर्धार नाही तर भविष्यातील अनेक पिढ्यांच्या समृद्ध जीवनाची हमी आहे, असेच म्हणावे लागेल.

# बोलो जाता बरळ...



अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि त्यांच्या मंत्र्यांच्या बोलघेवडेपणामुळे भारतातील सरकारची कोंडी होण्याची ही पहिलीच वेळ नाही. अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यातील युद्धाचा भडका आणि होर्मुझ सामुद्रधुनीतील अडथळे यांच्या संभाव्य परिणामांबाबत सारे जग चिंतेत असताना अमेरिकी नेत्यांच्या तोंडच्या वाफा सुरूच असल्याने या आगीत तेल ओतले जात आहे. या आणीबाणीच्या परिस्थितीत भारताला रशियाकडून तेलखरेदीची 'परवानगी' दिल्याबाबतच्या अमेरिकेचे अर्थमंत्री स्कॉट बेझेंट यांच्या विधानामुळे थेट भारताच्या धोरणात्मक स्वायत्ततेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित झाले. त्यावरून गदारोळ झाल्याने अखेर अमेरिकेला खुलासा करण्याची वेळ आली आहे. रशियन तेलखरेदी सुरू राहणार असल्याने इंधनाच्या अस्थिर परिस्थितीत सध्यापुरता तरी दिलासा मिळाला आहे; मात्र युद्ध अधिक काळ लांबले, तर पेट्रोल-डिझेल आणि स्वयंपाकाच्या-वाहनांच्या गॅसची टंचाई आणि दरवाढीची टांगती तलवार कायम आहे. ऊर्जासुरक्षा, आंतरराष्ट्रीय संबंध आणि अर्थव्यवस्थेचे भवितव्य हे व्यामिश्र विषय असल्याने त्याबाबत जपून पावले टाकणे, हीच सध्याची गरज आहे; परंतु अमेरिकेतील नेत्यांची उलटसुलट विधाने आणि भारतातील सरकारचे मौन, यांमुळे देशातील राजकारणात सरकारची कोंडी करण्याची विरोधकांना संधी मिळते, हेसुद्धा विसरून चालणार नाही. इराणने होर्मुझच्या सामुद्रधुनीत तेलवाहू जहाजांना अटकाव करून साऱ्या जगाला एका प्रकारे खिंडीत गाठले आहे. त्याने तेल उत्पादक देशांचीही कोंडी झाली असून, त्यामध्ये प्रामुख्याने अमेरिकेच्या आखाती मित्रदेशांचा समावेश आहे. या संकटामुळे कतारने वायूउत्पादन थांबवले असून, हीच परिस्थिती कायम राहिल्यास काही आठवड्यांत तेल उत्पादक देशांना उत्पादन बंद करावे लागेल, असा इशारा दिला आहे. तसे घडल्यास संपूर्ण जागतिक अर्थचक्राला मोठा फटका बसू शकतो. गेल्या काही दिवसांतच कच्च्या इंधनाचा दर प्रतिबॅरल ९२ डॉलरवर गेला असून, त्यात अधिक वाढ होण्याची भीती आहे. भारताच्या एकूण इंधन गरजेतील ८५ टक्के तेल आयातीचे आहे व त्यापैकी निम्मी आयात होर्मुझमार्गे होते; तसेच गॅसआयातीपैकी सुमारे ९० टक्के गॅसही याच मार्गाने येतो. हा मार्ग बंद झाल्याने देशावर इंधन व गॅसटंचाईचे सावट दाटणे साहजिक आहे. या पार्श्वभूमीवर रशियाकडून तेल घेण्यास अमेरिकेने भारतास 'परवानगी' दिल्याच्या तेथील अर्थमंत्री बेझेंट यांच्या विधानांवरून गदारोळ होणे स्वाभाविकच. पूर्वी अमेरिकेच्या निर्बंधांविरोधात इंदिरा गांधी आणि अटलबिहारी वाजपेयी यांनी खंबीरपणा दाखवल्याचे दाखलेही देण्यात आले. अजूनही रशियन तेलखरेदीस अमेरिकेची 'परवानगी', 'मुभा' की 'सवलत', यावरून शब्दच्छल सुरू आहे. रशियन तेल हा सध्या भारतासाठी दिलासा असला, तरी भारताने कोणाकडून तेलखरेदी करावे, हे ठरवणारी आणि तथाकथित 'मुभा' देणारी अमेरिका कोण, हा खरा प्रश्न आहे. दुसरीकडे सरकारकडूनही त्याला स्पष्ट शब्दांत प्रत्युत्तर दिले गेले नाही. अखेर तेलबाजारात स्थैर्य आणण्यासाठी हा निर्णय घेतल्याचा खुलासा अमेरिकेच्या मंत्र्यांना करावा लागला; मात्र 'परिस्थिती निवळल्यावर भारत पुन्हा जोमाने अमेरिकेकडून तेलखरेदी करील,' ही मेख मारलेली आहेच. 'ऑपरेशन सिंदूर'च्या काळात भारताची विमाने पडली', 'भारत-पाक युद्धात आपण मध्यस्थी केली' येथपासून ते नियोजित व्यापारकराराबाबत भारताला शेतमाल निर्यात आणि व्यापारशुल्कावरून त्यांच्या व त्यांच्या मंत्र्यांची विधाने ही जणू अमेरिका 'दाता' आणि भारत 'मूक याचक' असल्याचे ध्वनित करणारी आहेत. भारत सरकारच्या अवाजवी गोपनीयतेमुळेही गोंधळात भर पडत आहे.

सध्याची बदलती लाइफस्टाइल पाहता काही जणांना कमी वयातच केस पांढरे होत असल्याची समस्या पाठी लागते. कमी वयात केस पांढरे झाल्याने ते तुमच्या पर्सनॅलिटीला न शोभण्यासारखे असून त्याबाबत चिंता सतावते. फॅशन तर दूर कमी वयात केस पांढरे होणे काहीसे लाजीरवाणे आहे. काही लोकांना शारीरिक कमकुवतेमुळे अशा प्रकारची समस्या येते. काहीजण केस पांढरे होत असल्याने गोळ्यासुद्धा घेतात. परंतु गोळ्या घेणे ही बाब चुकीची असून ती तुमच्या आरोग्याला घातक ठरू शकते. त्यामुळे डॉक्टरांचा सल्ला घेतल्याशिवाय कोणत्याही गोळ्यांचे सेवन करू नये असे सांगितले जाते. तुम्हालासुद्धा जर केस पांढरे होण्याची समस्या भेडसावत आहे तर त्यावर आताच उपाय करा. तर जाणून घ्या केस सफेद होत असल्यास कोणत्या गोष्टी खाणे महत्त्वाचे आहे.

# कमी वयात केस पांढरे होण्याची समस्या सतावत असल्यास करा 'या' गोष्टींचे सेवन

**संत्र्याचे सेवन करा :** कमी वयात केस सफेद होत असतील तर त्यापासून सुटका मिळवण्यासाठी संत्रे खा. कारण संत्र्यात व्हिटामीन सी असून ते तुम्हाला कोलेजन प्रोटीनची वाढ करण्यास मदत करतात. संत्रे खाल्ल्याने केस सफेद होण्याची समस्या कमी होण्यासोबत केसांची वाढ होण्यास मदत होते.

**फर्मेन्टेड फुड्स :** प्रोबायोटिक नेहमीच आरोग्य स्वस्थ राहण्यासाठी उपयुक्त ठरतात. खासकरून केसांसाठी या गोष्टीचे सेवन केल्यास तुम्हाला केस सफेद होण्याची समस्या कमी होईल. फर्मेन्टेड फूड्स म्हणजे दही, विनेगर, आवळासारख्या पदार्थांचा समावेश होतो. काळे केस कायम राखण्यासाठी फर्मेन्टेड फूड्स जरूर खा.

### डार्क चॉकलेट

शरीरात लोह आणि कॉपरची कमी असल्याने केस सफेद होण्याची समस्या सतावते. त्यामुळे डार्क चॉकलेट हे उत्तम पोषक तत्त्व असून ते सफेद झालेल्या केसांसाठी उपयुक्त ठरते. त्यामुळे डार्क चॉकलेटचे सेवन करा. मात्र तुम्हाला घरगुती आणि नैसर्गिक पद्धतीने केस गळतीची समस्या सोडवायची असल्यास तुम्ही मेथी दाण्यांचा उपयोग करा. मेथीचे दाणे सुक्या आवळ्यासोबत वाटून त्याची पावडर बनवू शकता. त्यानंतर ही पावडर तेलामध्ये मिक्स करून केसांना लावा. यामुळेसुद्धा केसांची गळती थांबण्यास मदत होईल.



# केस रंगवताना घेण्यात येणारी काळजी

सर्वात पहिली काळजी म्हणजे दर्जेदार रंगच निवडा, तिकडे तडजोड नको. पहिल्यांदाच रंग लावत असाल तर केसांच्या छटेपेक्षा वेगळी छटा निवडा; परंतु तो तुम्हाला शोभेल याची खात्री करून घ्या. चांगल्या शॅम्पूने केस धुवा, मात्र कंडिशनर लावू नका. कंडिशनरमुळे रंग नीट बसत नाही. धुतलेले केस विंचरण्यासाठी कायम मोठ्या दातांचा कंगवा वापरा म्हणजे केस जास्त तुटणार नाहीत. केस वाळवण्यासाठी ते टॉवेलने जोरजोरात पुसू नका, म्हणजे ते तुटणार नाहीत. त्याऐवजी डोक्याला टॉवेल गुंडाळून केसांमधील पाणी टॉवेलने टिपून घ्या. केस वाळवण्यासाठी ड्रायरचा वापर करू नका. ओल्या केसांना रंग लावू नका. रंग लावताना हातात मोजे घाला. कपाळावर, कानांवर, मानेवर रंगाचे डाग पडू नयेत म्हणून व्हॅसलीन वा खोबरेल तेल लावा. रंग लावलेले केस लिंबाचा रस घातलेल्या पाण्याने धुवा, जेणेकरून रंग दीर्घकाळ टिकेल. रंग लावल्यावर केसांमधील आर्द्रतेचं प्रमाण कमी होतं व केस कोरडे होतात. त्यामुळे केस धुण्यासाठी रंग लावलेल्या केसांसाठी खास असं नमूद केलेला शाम्पू आणि कंडिशनरच वापरा. केसांची वाढ झाल्यावर केसांच्या मुळाशी त्यांचा नैसर्गिक रंग दिसू लागतो. अशा वेळी केसांना टचअप करायला विसरू नका. टचअप करताना केस मुळाशी आधी रंगवा, १५ मिनिटांनंतर बाकीच्या केसांना रंग लावा.



# दुधाबरोबर मध घेण्याचे फायदे जाणून घेऊ या

आपल्याला हे माहितीच आहे की, नियमित दूध पिणं आरोग्यासाठी फायदेशीर आहे. परंतु दुधात मध घातल्यावर त्याचा फायदा दुपटीने होतो. असे केल्यास आरोग्यविषयक समस्यांपासून आपण मुक्त होऊ शकतो.

### दुधामध्ये मध घालून पिण्याचे ५ फायदे जाणून घ्या..

▮ दररोज १ कपात दुधात मध घालून प्यायल्याने शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी फायदेशीर असते. हे दोन्ही प्रकारच्या क्षमता वाढविण्यास उपयुक्त आहे.

▮ अनिद्रेची समस्या असल्यास रात्री कोमट दुधात मध वापरा, असे केल्यास अनिद्रेची समस्या नाहीशी होते आणि त्वरित आराम मिळतो.

▮ पचन सुधारण्यासाठी दुधात मध घालून पिण्याने बद्धकोष्ठतेच्या त्रासापासून सुटका होते.

▮ दुधात प्रथिने आणि कॅल्शियम भरपूर प्रमाणात असते आणि मध प्रतिकारकशक्ती वाढवण्यास सक्षम असते. यांना एकत्र करून प्यायल्याने उत्तम आरोग्य पर्याय असल्याचे सिद्ध करतात.

▮ ताणतणाव दूर करण्याचे हे एक उत्तम साधन आहे. कोमट दुधात मध घालून प्यायल्याने प्रजनन क्षमता आणि शुक्राणूंची संख्या वाढवण्यास मदत करते.



चिंच हे नाव घेताच तोंडाला पाणी सुटतं. आंबट-गोड चिंच आरोग्यासाठी फायदेशीर असल्याचे सांगितले जाते. खाद्यपदार्थांची चव वाढवण्यासाठी अनेक प्रकारच्या पाककृतींमध्ये चिंचेचा वापर केला जातो. चिंचेमध्ये प्रोटीन, फायबर, कार्बोहायड्रेट्स, फोलेट, व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन ए, ई, के, बी६, फॉस्फरस, पोटॅशियम, कॅल्शियम, मॅग्नेशियम, लोह यांसारखे पोषक घटक असतात. ज्यामुळे शरीराला अनेक फायदे मिळू शकतात. पण तुम्हाला माहीत आहे का की चिंचेचे जास्त सेवन करणेदेखील आरोग्यासाठी हानीकारक असू शकते. चला तर मग जाणून घेऊया कोणत्या लोकांनी चिंच खाऊ नये.

# या ४ लोकांनी चिंच खाऊ नये, आरोग्याची हानी होऊ शकते

**डायबिटीज :** डायबिटीजच्या रुग्णांनी चिंचेचे सेवन करू नये. विशेषतः जेव्हा तुम्ही कोणतेही औषध घेत असाल तेव्हा चिंचेचे सेवन टाळा.

**ॲलर्जी :** चिंच खाल्ल्याने अनेकांना ॲलर्जीची समस्या होऊ शकते. म्हणून जर आपल्याला चिंच खाल्ल्यावर त्वचेवर चट्टे किंवा खाज, तसेच उल्टी यासारख्या समस्यांना सामोरा जावे लागत असेल तर याचे सेवन लगेच बंद करा.



**दातांना नुकसान :** चिंचेत ॲसिडिक घटक आढळतात, याने दातांचा पृष्ठभाग खराब होतो. त्यामुळे चिंचेचे सेवन मर्यादित प्रमाणात करावे, जर तुम्हाला दातांची समस्या असेल तर चिंचेचे सेवन करू नका.

**गर्भवती महिला :** गर्भवती स्त्रियांना यादरम्यान आंबट वस्तू खाण्याची इच्छा होते, मात्र अधिक प्रमाणात चिंच खाल्ल्याने गर्भवती स्त्रियांना नुकसान होऊ शकते. अशात या गोष्टी खाण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

**अस्वीकरण :** ही सल्ला देणारी सामग्री केवळ सामान्य माहिती प्रदान करते. हे कोणत्याही प्रकारे पात्र वैद्यकीय मताचा पर्याय नाही. अधिक माहितीसाठी तज्ज्ञ किंवा तुमच्या डॉक्टरांचा सल्ला घ्या.

# तुळशीच्या पानांनी होणारे ५ आश्चर्यात टाकणारे फायदे

■ तुळशीच्या पानात अँटी ऑक्सिडंट असतात जे आपल्या शरीराची रोगप्रतिकारक क्षमतेला वाढवण्याचे काम करते.

■ आपल्याला सर्दी, पडसं किंवा ताप आल्यास खडी साखर, काळे मिरे आणि तुळशीच्या पानांना पाण्यामध्ये उकळवून काढा करावा आणि त्याचे सेवन करावे किंवा आपण या काढ्याचा घोळ वाळवून याचा बारीक बारीक गोळ्या बनवून खाल्ल्यामुळे सर्दी, पडसं आणि तापामध्ये फायदेशीर आराम होईल.

■ ज्यांच्या तोंडाला वास येतो त्यांनी दररोज सकाळी उठल्यावर तुळशीचे पान तोंडात ठेवायला हवे. असे केल्यास तोंडाच्या वास येणे कमी होते.

■ शरीरावर कुठेही जखम झाल्यास तुळशीच्या पानांना तुरटीबरोबर जखमेवर लावल्याने जखम लवकरच बरी होते.

■ जुलाब लागले असल्यावर तुळशीच्या पानांमध्ये जिरे टाकून वाटून घ्यावे. या मिश्रणाला दिवसभरातून ३-४ वेळा चाटून घेणे. असे केल्यास आपल्याला जुलाब बंद होण्यात फायदाच होईल.



ब्लाटिंग म्हणजे पोट फुगणे. काही वेळेस ॲसिडिटीने पण पोट फुगत असते. काही गरिष्ठ खाण्यात आल्यानेही हा त्रास होतो. पण आज आपण या लेखात मासिक पाळीदरम्यान होणाऱ्या ब्लॉटिंगबद्दल जाणून घेऊ या. तसेच त्यावरील उपायदेखील जाणून घेऊ या. मासिकपाळीच्या काळात ॲसिडिटीमुळे पोटात दुखते पोट फुगण्याचा त्रास देखील होतो. त्यासाठीचे काही उपाय केल्यास त्या त्रासापासून आणि वेदनांपासून मुक्ती मिळते.



# ब्लॉटिंगचा त्रास असल्यास हे करा...

■ चमचमीत मसालेयुक्त पदार्थांचा वापर टाळावा यामुळे ॲसिडिटीचा त्रास होतो.

■ पचनतंत्रामध्ये बिघाड होतो, त्यासाठी आपले पचनतंत्र सुरळीत करण्यासाठी आलं आणि लिंबाच्या चहाचे सेवन करावे.

■ गवती चहा घ्यावा ॲसिडिटीचा त्रास कमी होतो.

■ पाणी तर सर्व गोष्टींवर रामबाण उपाय आहे. जास्त पाणी पिणे उत्तम स्वास्थ्य असण्याची लक्षण आहे. पाण्यामुळेच सर्व आजार नाहीसे होतात. त्यामुळे जेवढे जमेल तेवढे पाणी पिणे फायदेशीर असतं.

■ या काळात आपल्या शरीरास पौष्टिक तत्त्व पाहिजे असतात. कॅल्शियम आणि मॅग्नेशियम आहारयुक्त पदार्थांचं समावेश करणं फायदेशीर ठरतं. केळ आणि दुधात कॅल्शियम असतं. त्याचे सेवन करावे.

■ या काळात अशा वस्तू ज्या गॅस वाढवतात आणि पोट फुगवतात ते खाणे टाळावे. सकस आहार घ्यावा. ब्रोकोली, कोबी, फ्लॉवरची भाजी खाऊ नये. त्यामुळे गॅसेस पण होते आणि ॲसिडिटीचा त्रास जास्त वाढण्याची शक्यता असते.

■ आलं शरीरातील सूज कमी करण्यास फायदेशीर असतं. यामध्ये अँटी इन्फ्लेमेटरी आणि अँटी स्पॅस्मोडिकचे गुणधर्म असतात. शरीरातील वेदना दूर करण्याचे काम करतं.

■ काही वेळा काही जण ॲसिडिटी आहे म्हणून शीतपेयाचे सेवन करतात. असे केल्याने ब्लॉटिंगचा त्रास अजून वाढतो.

■ चहा जास्त घेऊ नका कारण ॲसिडिटी वाढण्यासाठी हे कारणीभूत आहे.

■ व्यायाम आणि योगा करा. पण थकवा जाणवेल असे काही करू नका.

■ पपई ही पचनतंत्र सुरळीत करण्याचे कार्य करते. यामधले असलेले पपॅन एंझाइम पचन संस्थेला सुरळीत ठेवण्याचे काम करते. पपई खाल्ल्याने ॲसिडिटी, गॅस, ब्लॉटिंगच्या त्रासापासून सुटका होते.

■ मदिरासारखे अल्कोहोल घेत असल्यास त्वरित घेणे बंद करावे. यामुळे ॲसिडिटीचा त्रास कमी होण्याऐवजी जास्त वाढतो.

फेफरे (फिट्स) हा आजार आपल्या मेंदूशी संबंधित आहे. आपल्या मेंदूमध्ये अतिसुक्ष्म वाहिन्या असतात, त्यांना न्यूरॉन असे म्हटले जाते. न्यूरॉन आपापसात नेहमी संपर्कात असतात. एकमेकांना संदेशाचे आदानप्रदान करत असतात. संदेश वहन करण्याचे कार्य इतक्या प्रचंड वेगाने होत असते की, त्याने आपल्या मेंदूत रासायनिक व विद्युत तरंग निर्माण होतात. परंतु, एखाद्या संदेशाचे व्यवस्थित वहन न होता तो वाहिनीत अडकून पडतो. मेंदूचे संतुलन बिघडते व त्यामुळे आपल्याला फिट्स येतात. पण घाबरून जाऊ नका. फिट्सवर घरगुती उपचार आहेत.

# फिट्स आल्यास घाबरू नये

**फिट्स** दोन मिनिटांपेक्षा जास्त वेळाची नसते. ती केव्हाही व कोणत्याही वयाच्या व्यक्तीला येऊ शकते. अचानक आपल्याला चक्कर येऊन आपण जमिनीवर पडतो व शुद्ध हरपते. फिट्स आल्यानंतर आपल्या हातापायात कंप निर्माण होतात. तोंडातून फेस येतो. वारंवार फिट्स येत असेल तर आपल्याला खालील टिप्स उपयोगी पडू शकतात.

▮ अक्कलकाढा १०० ग्रॅम व लिंबू सत्त १०० ग्रॅम यांचे मिश्रण मधामध्ये एकजीव करून ५ ग्रॅम प्रतिदिन सकाळी काहीही न खाण्यापूर्वी चाखल्याने फिट्स येणे कायमचे दूर होते.

▮ सालवटीचे चूर्ण एक ग्रॅम प्रतिदिन मधासोबत चाखावे. त्यानंतर दूध प्यावे. असे नियमित केल्याने जुनाट फिट्स दूर होतात.

▮ शुद्ध हरपलेल्या व्यक्तीला लसूण कुटून वास दिल्यास तो शुद्धीवर येतो.

▮ रोज ३-५ लसणाच्या पाकळ्या दुधात टाकून ते प्यायल्याने फिट्स येत नाहीत.


# आरामदायक 'ट्रेंडी' पँट

**फॅशनच्या** जगात महिलांसाठी पँटचे पुनरागमन झाले आहे. पॅरिस फॅशन शो असो की लक्मे फॅशन वीक सगळीकडे पँट्स परिधान केलेल्या मॉडेल दिसू लागल्या आहेत. एवढंच नव्हे तर फॉर्मलशिवाय याचा उपयोग कॅजुअल्समध्ये देखील होताना दिसत आहे.

सध्या कॉर्पोरेट कल्चरमुळे कपडे घालण्याच्या पद्धतीत कमालीचा बदल जाणवत आहे. मुली फॅशनसोबतच आरामालाही महत्त्व देत आहेत. म्हणूनच जीन्स-ट्राऊजरसारखे कपडे मुलींची पहिली पसंत झाली आहे. पिकनिक, आऊटिंग किंवा वीकेंडला जीन्स परिधान करताना दिसत आहेत. पण मीटिंग, कॉन्फरन्स, ऑफिशियल पार्टी किंवा सेमिनारच्या वातावरणात हे फिट बसत नाही. म्हणूनच मुलींनी आता पँट-ट्राऊजरला प्रमुख पोशाखांमध्ये सहभागी केले आहे. त्यातही विविध प्रकार आहेत. - ट्राऊजर, सिक्स पॉकेट, कार्गो, बूट कट आदी.

तुम्ही ऑफिस व्यतिरिक्त टी पार्टी किंवा डिनर पार्टीत सिल्क शर्टासोबत पँट परिधान करू शकता.

पँट आरामदायक असल्यामुळे हल्ली मोठ्या इन्स्टिट्यूटनी शर्ट-पँट हा युनिफॉर्म म्हणून स्वीकारला आहे. एअरलाइन्स, हॉस्पिटलच्या व्यतिक्ति काही बँका आणि कॉलेजमध्ये आता मुली युनिफॉर्म म्हणून पँट-शर्ट परिधान करायला लागल्या आहेत. त्याने स्मार्टनेस वाढतोच आणि धावपळीची कामे सोपी होतात. पँटसोबत साधारण कॉटन शर्ट असो किंवा सिल्क व जॉर्जेटचे शर्ट अगदी सर्व मॅच करतात. एखाद्या डिनर पार्टीत एक शानदार स्कार्फ किंवा शालसुद्धा पँट-शर्ट सोबत छान दिसते. तसेच त्यावर बीडसची माळ, डायमंड नेकलेस किंवा नेकपीस, ब्रेसलेट, लेदर बेल्ट, कॉर्पोरेट बॅग्जपासून क्लच आणि पर्स हेही मॅच होते. पँट परिधान केल्यास लेदर शूज, सँडल, ट्रेंडी चप्पलसुद्धा परिधान शकता. त्याचबरोबर आपण पिकनिक आणि खेळण्यासाठी कार्गो किंवा सिंपल बूट कट देखील वापरू शकता.



**पँटसोबत साधारण कॉटन शर्ट असो किंवा सिल्क व जॉर्जेटचे शर्ट अगदी सर्व मॅच करतात. एखाद्या डिनर पार्टीत एक शानदार स्कार्फ किंवा शालसुद्धा पँट-शर्ट सोबत छान दिसतो.**



# वेळ सत्कारणी लावा

**बयापैकी** श्रीमंत असलेल्या कुटुंबाच्या काही सवयी असतात. विशेषतः वृद्ध स्त्रियांना पेपर वाचायचा असतो. सकाळ-संध्याकाळ बाहेर फिरून यायचे असते. ठरावीक पदार्थाचा आस्वाद घ्यायचा असतो. वैयक्तिक अशी त्यांची कामे त्यांना करायची असतात. इतकेच नव्हे; तर आपले आरोग्य उत्तम राहण्यासाठी व्यायामही करायचा असतो. तेवढे पथ्यही त्यांना पाळायचे असते. वेळच्या वेळी औषध घेणे आणि आरोग्य अबाधित ठेवण्यासाठी सोबतीला कोणी मदतनीस स्त्री मिळाली तर ती त्यांना हवी असते. ज्यांना अशा सेवेत रूची आहे, त्यांना ही कामे करता येतील.

आई-वडिलांकडे लक्ष देता यावे म्हणून काही मुले-मुली खासगीरीत्या नर्स ठेवत असतात. पण ही नर्स फक्त आरोग्याची देखभाल करते. आपण पुढाकार घेतला तर सोप्या गोष्टी करता येणे शक्य आहे.



# वाढतं वजन थांबवायचंय ? मग आहारात करा या घटकांचा समावेश

**बदलत्या जीवनशैलीमुळे वाढतं वजन ही प्रत्येकाची समस्या झाली आहे. त्यामुळे वाढलेले वजन कमी करण्याचा अनेक जण वेगवेगळ्या पद्धतीने प्रयत्न करत असतात. अनेक वेळा डाएट करूनही वाढलेल्या वजनाला आळा बसत नाही. अशा वेळी आहारामध्ये वजन कमी करण्यास मदत करणाऱ्या पदार्थांचा समावेश करायला हवा. या पदार्थांच्या सेवनामुळे वारंवार लागणाऱ्या भुकेला आळा बसतो.परिणामी वजन लवकर वाढत नाही. असेच काही पदार्थ रुपम सिन्हा यांनी सांगितले आहेत.**

**लाल मिरची**

रोजच्या जेवणाला झणझणीतपणा येण्यासाठी अनेक वेळा गृहिणी भाजी, आमटीमध्ये लाल मिरची किंवा लाल तिखटाचा वापर करतात. मात्र जेवणाची रंगत वाढवणारी लाल मिरची वजन कमी करण्यासाठीदेखील तितकीच उपयोगी आहे. लाल मिरचीमध्ये कॅप्सॅकीन संयुग असतात. कॅप्सॅकीनमुळे शरीरातील मेटाबोलिज्म वाढविण्यास मदत होते. परिणामी वाढत्या वजनाला आळा बसतो.

**लसूण**

एखाद्या पदार्थाला खमंग फोडणी द्यायची असेल लसूण गरजेचाच आहे. मात्र लसणाचा उपयोग केवळ जेवणासाठीच होत नसून आजारपणातही होतो. अनेक वेळा आजारपणामध्ये लसणाचा वापर औषध म्हणून केला जातो. त्याप्रमाणेच वजन कमी करण्यासाठीदेखील लसणाचा उपयोग होतो. जेवणामध्ये लसणाचा समावेश असेल तर जेवताना पोट भरलंय ही भावना मस्तिष्कापर्यंत पोहोचवण्याचं काम लसूण करतो. त्यामुळे पोट भरल्यानंतर आपण आपोआप जेवायचं थांबवतो. त्यामुळे आहारात लसणाचा समावेश करायला हवा. त्यासोबतच रक्ताच्या गुठळ्या होण्यापासून लसूण मदत करतो. तर हृदयाचे आरोग्यही नीट राहते.

**लाल आणि हिरवी मिरची**

मसाल्याच्या पदार्थांमधील महत्त्वाचा घटक म्हणजे मिरची. लाल मिरचीप्रमाणेच सुकी लाल मिरची किंवा हिरवी मिरची यांचाही तितकाच शरीराला फायदा होतो. मिरचीमध्ये व्हिटॅमिन ए, सीसोबतच बीटा कॅरोटिन असतं. त्यामुळे योग्य प्रमाणात मिरचीचं सेवन केलं तर पचनक्रिया सुधारते आणि भूक नियंत्रणात राहते.

**दालचिनी**

भूक नियंत्रणात ठेवण्याचं महत्त्वाचं काम दालचिनी करत असते. दालचिनीमुळे शरीरातील अतिरिक्त चरबी कमी होते. त्यासोबतच दालचिनीच्या सेवनामुळे शरीरातील मेटाबोलिज्म वाढविण्यास मदत होते. दालचिनीमुळे धमन्यांचं कार्यही सुधारते आणि शरीरातील वाढलेल्या कोलेस्ट्रॉलची पातळी नियंत्रणात आणली जाते.

**कोकम ( आमसूल )**

आंबट, चटपटीत अशी चव असणाऱ्या कोकमाचे अनेक फायदे आहेत. भूक नियंत्रणात आणण्यासाठी कोकमचा उपयोग करण्यात येतो. त्यामुळे जेवणापूर्वी रोज एक कोकम खावं.



**गरम मसाल्यांसाठी प्रसिद्ध असलेलं राष्ट्र म्हणजे भारत. त्यामुळे प्रत्येक भारतीय व्यक्तीच्या स्वयंपाक घरामध्ये गरम मसाल्याचे पदार्थ हमखास आढळतात. जेवणाची चव वाढवणाऱ्या या पदार्थांपैकी काहींचा वापर आजीबाईच्या बटव्यासाठीही केला जातो. त्यामुळे चवीसोबतच हे पदार्थ गुणकारी असल्याचं दिसून येतं. मसाल्याच्या पदार्थांमध्ये महत्त्वाचा मानला जाणारा घटक म्हणजे चक्रीफूल. चक्रीफूल केवळ मसाल्याची चव वाढवत नसून त्याचे अन्यही काही गुणधर्म आहेत. इशा त्यागी यांनी चक्रीफुलाचे काही गुणधर्म सांगितले आहेत. ते पुढील प्रमाणे**

# चव वाढवणाऱ्या चक्रीफुलाचे असेही गुणकारी फायदे

**वाढत्या वयाची लक्षणे थांबवण्यासाठी**

वय वाढायला लागलं की त्याच्या खुणा चेहऱ्यावर आपोआप दिसू लागतात. त्यामुळे अनेक वेळा तरुणी किंवा महिला प्रसाधनांचा वापर करून वाढत्या वयाच्या खुणा लपवण्याचा प्रयत्न करतात. मात्र आपल्या आहारात समावेश केलेल्या पदार्थांमुळेदेखील ही समस्या टाळता येऊ शकते. रोजच्या जेवणामध्ये वापरण्यात येणाऱ्या मसाल्यामध्ये चक्रीफूल हे महत्त्वाचं काम करत असतं. चक्रीफूल वाढत्या वयाच्या खुणा लपवण्याचं काम करतं. यामध्ये व्हिटॅमिन 'ए' आणि 'सी'चे प्रमाण मोठ्या प्रमाणावर असते. त्यासोबतच त्यात अँटीऑक्सिडंटचे गुणही असतात. चक्रीफुलामध्ये शरीरातील फ्री रॅडिकल्सला नियंत्रणात आणण्याची क्षमता असते. त्यामुळे वाढत्या वयाची लक्षणं रोखण्याचं काम चक्रीफूल करते.



**सर्दी-खोकल्यावर गुणकारी**

कोणत्याही ऋतूमध्ये होणारा आजार म्हणजे सर्दी आणि खोकला. काही जणांना थंड पदार्थांचं सेवन केल्यानंतर लगेच सर्दी-खोकल्याची समस्या निर्माण होते. अशावेळी चक्रीफूल हे फायदेशीर ठरते. चक्रीफुलामध्ये थाइमो आणि एथोल याचे गुणधर्म असतात. त्यामुळे सर्दी किंवा खोकल्यावर चक्रीफूल गुणकारी आहे. त्यासोबतच शरीरामध्ये उष्णता वाढवण्याचं काम चक्रीफूल करते.

**पचनक्रिया सुधारते**

उशिरा जेवण झाल्यामुळे किंवा एखाद्या वेळी चुकीचे पदार्थ खाल्ल्यामुळे अनेक वेळा अपचन, पोटात गॅस होणे, पोटदुखी या सारख्या समस्या निर्माण होतात. मात्र या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी चक्रीफूल फायदेशीर ठरते. चक्रीफुलामुळे पचनक्रिया सुधारते. त्यामुळे आपल्या आहारात चक्रीफुलाचा समावेश करायला हवा.

# राष्ट्रीय महामार्गावरील प्रवास होणार महाग

## 1 अप्रिलपासून फास्टटॅग वार्षिक टोल पासच्या दरात वाढ

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

राष्ट्रीय महामार्गावर वारंवार प्रवास करणाऱ्या वाहनचालकांसाठी महत्वाची बातमी समोर आली आहे. 1 एप्रिल 2026 पासून राष्ट्रीय महामार्गावरील फास्टटॅग वार्षिक टोल पासच्या दरात 75 रुपयांनी वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे नियमितपणे महामार्गावर प्रवास करणाऱ्या वाहनचालकांसाठी आता आधीपेक्षा अधिक पैसे मोजावे लागणार आहेत. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने 2026-27 या आर्थिक वषासाठी नवीन दर लागू करण्याचा निर्णय घेतला आहे.

देशभरातील राष्ट्रीय महामार्गावरून प्रवास करताना वाहनचलकांना टोल भरावा लागतो. मात्र जे वाहनधारक दररोज किंवा वारंवार या मार्गावरून प्रवास करतात त्यांच्यासाठी वार्षिक टोल पासची सुविधा उपलब्ध आहे. या पासमुळे प्रत्येक वेळी टोल नाक्यावर पैसे भरण्याची गरज भासत नाही.

मात्र आता या वार्षिक टोल पासच्या किमतीत वाढ करण्यात आली आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या निर्णयानुसार, 1 एप्रिल 2026 पासून वार्षिक टोल पासची किंमत 3000 रुपायांवरून 3075 रुपये करण्यात आली




आहे. म्हणजेच वाहनचलकांना यासाठी 75 रुपये जास्त द्यावे लागणार आहेत. हा वार्षिक पास केवळ खाजगी म्हणजेच गैर-व्यावसायिक (खाजगी) वाहनांसाठी लागू आहे. व्यावसायिक वाहनांना ही सुविधा लागू होत नाही. तसेच वाहनात सक्रिय फास्टटॅग असणे आवश्यक आहे.

वार्षिक टोल पासची वैधता एक वर्ष किंवा 200 टोल क्रॉसिंगपर्यन्त असते. म्हणजेच एखाद्या वाहनाने एका वर्षात 200 वेळा टोल प्लाझा ओलांडला, तर त्या क्षणापासून पासची वैधता संपते, जरी एक वर्ष पूर्ण झाले नसले तरीही. त्यामुळे नियमितपणे महामार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांसाठी हा पास फायदेशीर ठरतो.

सरकारकडून दरवर्षी टोल दारांचा आढावा घेतला जातो. त्या प्रक्रियेचा एक भाग म्हणून यावेळी वार्षिक टोल पासच्या किमतीत किरकोळ वाढ करण्यात आली आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने सर्व टोल प्लाझा आणि संबंधित अधिकाऱ्यांना 1 एप्रिलपासून नवीन दर लागू करण्याचे निर्देश दिले आहेत.

दरम्यान, राष्ट्रीय महामार्गावर वारंवार प्रवास करणाऱ्या वाहनचालकांसाठी वार्षिक टोल पास हा अजूनही सोयीचा पर्याय मानला जातो. कारण यामुळे प्रत्येक टोल नाक्यावर थांबून वेगळे पैसे भरण्याचा त्रास कमी होतो.

**असा मिळेल वार्षिक टोल पास...**

वाहनचालकांना वार्षिक टोल पास घेण्यासाठी त्यांच्या वाहनामध्ये सक्रिय ऋअरळँ असणे आवश्यक आहे. वाहन मालक राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकृत वेबसाइटवर किंवा फास्टटॅग सेवा देणाऱ्या बँक किंवा मोबाइल ॲपवर लॉग इन करून या पाससाठी अर्ज करू शकतात. निर्धारित शुल्क भरल्यानंतर हा पास वाहनांच्या फास्टटॅग सोबत लिंक केला जातो. त्यानंतर टोल नाक्यावर वेगळे पैसे भरण्याची गरज भासत नाही. आणि वाहनचालक सहजपणे प्रवास करू शकतात.

# हजारो करदात्यांना हायकोर्टचा मोठा दिलासा

■मुंबई। प्रतिनिधी,

जुन्या थकबाकीसाठी सेटलमेंट योजनेचा लाभ घेतलेल्या राज्यातील हजारो करदात्यांना दिलासा मिळण्याची शक्यता आहे. एखाद्या करदात्याने 'ॲम्नेस्टी स्कीम' अंतर्गत थकबाकीचा निपटारा करण्यासाठी अर्ज केला असल्यास सरकार त्यांचा जुना टॅक्स रिफंड नवीन मागणीविरुद्ध परस्पर वळता करू शकत नाही, असा महत्त्वपूर्ण निर्णय उच्च न्यायालयाने एका प्रकरणात दिला.



'प्रेसिडेंट ट्रेड अँड एक्झिम कॉर्पोरेशन' नावाच्या कंपनीने दाखल केलेल्या याचिकेवर न्या. गिरीश कुलकर्णी आणि न्या. आरती साठे यांच्या खंडपीठापुढे सुनावणी झाली. कंपनीचा २००७-०८ या वर्षाचा ३३.२९ लाख रुपयांचा रिफंड सरकारकडे प्रलंबित होता. याचदरम्यानच्या काळात सरकारने प्रलंबित कर विवादांसाठी 'महाराष्ट्र थकबाकी तडजोड योजना २०२३' जाहीर केली. त्या योजनेंत याचिकाकर्त्या कंपनीने २००८-०९ आणि २००९-१० या वर्षातील थकबाकीचा निपटारा करण्यासाठी अर्ज केला आणि नियमानुसार २० टक्क्यांची रक्कम भरली.

मात्र, विक्रीकर विभागाने कंपनीचा आर्थिक वर्ष २००७-०८ चा रिफंड थेट २००८-०९ च्या थकबाकीशी वळता केला आणि रिफंड देण्यास नकार दिला. यावर याचिकाकर्त्या कंपनीच्या वकिलांनी जोरदार आक्षेप घेतला.

त्यावर सरकारची बाजू ऐकून घेत मुंबई उच्च न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी यांच्या खंडपीठाने निर्णय दिला. 'सेटलमेंट ॲक्ट' हा एक स्वतंत्र कायदा आहे. या कायद्यांतर्गत एकदा करदात्याने या योजनेचा लाभ घेतला की, तो थकबाकीतून मुक्त होतो. परताव्याची रक्कम अशा प्रकारे थकबाकीशी वळती करणे हे सेटलमेंट योजनेच्या उद्देशाला हरताळ फासणारे आहे, असे निरीक्षण मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने नोंदवले आणि १८ एप्रिल २०२४ रोजी कर विभागाचा आदेश रद्द केला. याचवेळी याचिकाकर्त्या कंपनीचा ३३.२९ लाख रुपयांचा रिफंड व्याजासह २ आठवड्यांच्या आत कंपनीच्या खात्यात जमा करण्याचे आदेश राज्य सरकारला दिले.

# एका दिवसात ४५ हजार गॅस सिलिंडरचे वितरण

## ठाणे शिधावाटप विभागाचा दावा... घरगुती पुरवठा सुरळीत, व्यावसायिकवर तात्पुरती मर्यादा

■ठाणे। प्रतिनिधी,

मध्य पूर्वेत सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर त्याचे परिणाम आता स्वयंपाकघरापर्यंत पोहोचू लागल्याची चर्चा सुरू असतानाच ठाणे जिल्ह्यात व्यावसायिक गॅस सिलिंडरची विक्री तात्पुरती बंद करण्यात आली आहे. मात्र घरगुती गॅस सिलिंडरचा पुरवठा पुरेशा प्रमाणात सुरू असल्याचा दावा शिधावाटप विभागाकडून करण्यात आला आहे.

असे असले तरी मागील काही दिवसांत ठाणे शिधावाटप परिमंडळ 'फ' मध्ये घरगुती गॅस सिलिंडरची बुकिंग थेट दीड लाखांच्या आसपास गेल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, गुरुवारी एका दिवसात तब्बल ४५ हजार गॅस सिलिंडरचे वितरण ग्राहकांना करण्यात आल्याचा दावा प्रशासनाने केला आहे. इराण, अमेरिका आणि इस्रायल यांच्यातील तणाव दिवसेंदिवस वाढत असून या वाढत्या तणावामुळे खनिज तेल आणि गॅस वाहतुकीवर परिणाम होत असल्याचे सांगितले जात आहे. त्याचा फटका भारतालाही बसण्याची शक्यता व्यक्त केली जात असून देशातील काही भागात गॅस पुरवठ्यावर परिणाम झाल्याची चर्चा आहे. काही ठिकाणी गॅस मिळवण्यासाठी नागरिकांना रांगा लावाव्या लागत असल्याचेही चित्र दिसून येत आहे.



"सध्या व्यावसायिक गॅस सिलिंडरचा पुरवठा मर्यादित करण्यात आला आहे. मात्र घरगुती गॅस सिलिंडरचा नियमित पुरवठा सुरू आहे. गॅसबाबत सुरू असलेल्या चर्चांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून त्यामुळे बुकिंगची संख्या वाढल्याचे दिसून येत आहे. तरीही गुरुवारी एका दिवसात ४५ हजार गॅस सिलिंडरचे वितरण करण्यात आले आहे. त्यामुळे नागरिकांनी घाबरून जाऊ नये."

**-प्रशांत काळे, उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे**

**कंट्रोल रूमची स्थापना**

ठाणे 'फ' परिमंडळातील ७२ गॅस एजन्सींमार्फत घरगुती गॅस सिलिंडरच्या वितरणासाठी प्राधान्यक्रम निश्चित करण्यात आला आहे. शासनाच्या निर्देशांनुसार नागरिकांना किंवा हॉटेल व्यावसायिकांना गॅस सिलिंडरचा काळाबाजार आढळल्यास तक्रार करता यावी, यासाठी ८१६९२३०६६५ हा तक्रार क्रमांकही जाहीर करण्यात आला आहे.

**पेट्रोल-डिझेलचा पुरेसा साठा**

ठाण्यात दररोज सुमारे ८० ते ९० हजार लिटर पेट्रोल आणि ६० ते ७० हजार लिटर डिझेलचा साठा उपलब्ध होत असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# अवास्तव शुल्क आकारणाऱ्या महाविद्यालयांवर कारवाई

## उच्च आणि तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी विधानसभेत दिला इशारा

■मुंबई। प्रतिनिधी,

राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती अजार्ची प्रक्रिया अधिक सुलभ करण्यात आली आहे. मुलींना १०० टक्के तर मुलांना ५० टक्के शिक्षण शुल्क माफीचा लाभ देण्यात येत आहे. या निर्णयाविरोधात जाऊन अवास्तव शुल्क आकारणाऱ्या महाविद्यालयांवर कारवाई केली जाईल, असा इशारा उच्च आणि तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी प्रश्नोत्तराच्या तासात दिला.

प्रलंबित शुल्क प्रतिपूर्ती आणि शिष्यवृत्ती वितरणातील अडचणींबाबत समाजवादी पक्षाच्या रईस शेख यांनी प्रश्न विचारला होता. या प्रश्नाला उत्तर देताना पाटील म्हणाले, विद्यार्थ्यांसाठी अनेक वेळखाऊ बाबी होत्या, त्यांची सुलभता केली. शिष्यवृत्ती अजार्तील माहितीची संख्या १३८ वरून ६६ पर्यंत कमी करण्यात आली आहे. आवश्यक कागदपत्रे १७ वरून ८ वर आणली आहेत. आता सीईटी डेटा थेट वापरला जाणार असल्याने विद्यार्थ्यांना वारंवार जात प्रमाणपत्र किंवा इतर कागदपत्रे सादर करावी लागणार नाहीत. महाविद्यालयाची आर्थिक स्थिती लक्षात घेऊन शिष्यवृत्तीच्या पहिल्या हप्त्याचे वितरण लवकर केले जाईल. शिष्यवृत्तीच्या वितरणाला पगारापेक्षाही अधिक प्राधान्य देण्याचे निर्देश मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. येत्या जून महिन्यापासून याची अंमलबजावणी होईल, असेही पाटील यांनी सांगितले.



**...तर महाविद्यालयांवर कठोर कारवाई करणार**

थकीत देयके वेळेवर अदा करण्यासाठी काही वित्तीय संस्थांशी चर्चा सुरू आहे. राज्य सरकार व्याज देईल आणि या संस्था थेट विद्यार्थ्यांचे किंवा महाविद्यालयांचे शुल्क अदा करतील, जेणेकरून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही.शासकीय योजनांचा लाभ मिळत असूनही जे महाविद्यालय विद्यार्थ्यांकडून अवास्तव 'इतर फी' आकारतील किंवा प्रवेश प्रक्रियेत अडवणूक करतील, अशा महाविद्यालयांवर कठोर कारवाई केली जाईल, असेही चंद्रकांत पाटील यांनी बजावले.

**दरमहा दोन हजार अतिरिक्त भत्ता मिळणार**

राज्य सरकार विद्यार्थ्यांसाठी 'अर्न अँड लर्न' सारख्या नवीन योजनेतून सुमारे ५ लाख विद्यार्थ्यांना दरमहा दोन हजार रुपये अतिरिक्त मानधन देण्याची योजना आखत आहे. या योजनेसंदर्भात अजून अधिकृत कोणतीही घोषणा नाही. याअंतर्गत विद्यार्थी विद्यापीठ किंवा महाविद्यालयाच्या आवारात वृक्षारोपण, लायब्ररी व्यवस्थापन किंवा सामाजिक कामात मदत करतील. यासाठी शासन, महाविद्यालय आणि सामाजिक संस्था मिळून निधी उभारतील. निर्वाह भत्ता ही योजना शहरांच्या वर्गवारीनुसार विद्यार्थ्यांना १० महिन्यांसाठी वसतिगृह भत्ता दिला जातो, अशी माहिती पाटील यांनी दिली.

# 14 वर्षाच्या मुलीला लग्नाचे खोटे आमिष दाखवलं

## नंतर रेल्वेत जबरदस्ती नेत केले लैंगिक अत्याचार, तरुण पळाला अन्...

■गडचिरोली। प्रतिनिधी,

एका तरुणाने 14 वर्षाच्या मुलीला लग्नाचे आमिष दाखवून ट्रेनच्या डब्ब्यात तिच्यावर अत्याचार केला. मुलीने नकार दिला तरी तिच्यावर जबरदस्ती करण्यात आली होती. ही घटना झारखंडच्या साहिबगंज येथील तळझारी पोलीस ठाणे परिसरातील महाराजपूर रेल्वे स्थानकाजवळील उभ्या असलेल्या रेल्वेच्या डब्यात घडली होती. तरुणीने कसाबसा मार्ग काढत घटनास्थळावरून पळ काढला. दरम्यान आरोपीची परमेश महातो अशी ओळख पटली आहे.

**लग्नाचे आमिष दाखवून अल्पवयीन मुलीला रेल्वेत नेत केले लैंगिक अत्याचार**

घडलेल्या घटनेनुसार, पीडित मुलगी ही रेल्वे स्थानकाजवळील मेहुण्याच्या चहाच्या दुकानात झाडू मारत होती. त्याच ठिकाणी आरोपी परमेश तिथे आला आणि त्याने तिला स्टेशनवर बोलावून घेतले होते. नंतर लग्नाचे आमिष दाखवून तिच्याशी 10 ते 15 मिनिट वेळ देखील घालवला, नंतर तिच्यावर दबाव आणू लागला.

दरम्यान, तो तिला प्लॅटफॉर्म क्रमांक एकवर उभ्या असलेल्या ट्रेनमध्ये घेऊन गेला आणि तिच्यावर अत्याचार केला. आरोपी परमेशने घटनास्थळावरून पळ काढला होता. पीडितेनं देखील घरी जाण्यास यश मिळवलं आणि कुटुंबाला घडलेला सर्व प्रकार सांगितला. कुटुंबांनी जीआरपी पोलीस ठाणे गाठलं आणि घडलेल्या घटनेची माहिती दिली.

स्टेशन प्रभारी कैलाश महातो म्हणाले की, पीडितेच्या कुटुंबाने त्यांच्यावरील अत्याचाराची कहाणी सांगितली आहे. एफआरआय नोंदवण्यात येत आहे. पीडितेची वैद्यकीय तपासणी करण्यात आली असून आरोपी तरुणाचा शोध सुरु असल्याची माहिती आहे.



'तु काळी आहेस, आम्हाला आवडत नाहीस' म्हणत सासरच्यांकडून छळ

# अखेर सुनेनं विष पिऊन संपवलं जीवन



एवढंच नाहीतर तिला माहेरहून पैसे आणण्यास तगादा लावण्यात आला होता. सासरच्या मंडळींनी तिच्यावर अनेकदा दबाव देखील टाकला होता. सोबत तिच्या वर्णावरून तिला डिवचलं गेलं, 'तु काळी आहेस, आम्हाला आवडत नाहीस', अशा शब्दांत तिचा अवमान केल्याचा आरोप आहे. यामुळे ज्योतीला मानसिक त्रास होऊ लागला होता.

■बीड। प्रतिनिधी,

बीड जिल्ह्यातील माजलगावात माणुसकीला काळिमा फासणारा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. तू काळी आहेस, मला आवडत नाही, असे म्हणत नवऱ्याचे पीडिता महिलेला वारंवार छळलं. याच छळाला कंटाळून महिलेनं आत्महत्या करत जीवन संपवलं. या प्रकरणी पतीसह सासू-सासऱ्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेनं माजलगाव हादरून गेल्याचं चित्र आहे.

**नवरा बायकोच्या संसार मिठाचा खडा**

मृत महिलेचं नाव ज्योती पवार असे असून तिचा विवाह हा 2018 मध्ये झाला होता. तिच्या पतीचे नाव कृष्णा पवार असे आहे. लग्नानंतर त्यांचा सुखाचा संसार सुरु होता, पण याच संसारात मिठाचा खडा पडला. तिच्या सासरच्या मंडळींनी तिचा छळ करण्यास सुरुवात केली. तसेच तिला वर्णावरून अनेकदा हिणवलं.

**विष प्राशन करून ज्योतीनं संपवलं जीवन**

सासरच्या छळाला कंटाळून ज्योतीने 12 जानेवारी रोजी विष प्राशन केलं, त्यानंतर तिला उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथे नंतर पुणे येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. काही दिवसांतच उपचार सुरु असताना 18 जानेवारी रोजी तिचा दुर्दैवी मृत्यू झाला. या प्रकरणात आरोपी नवरा कृष्णा पवार, सासरा मनोहर पवार आणि सासू तारावाई पवार या तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

मुलाला ॲक्टर आणि आईला राज्यपाल बनवतो

# बड्या नेत्याशी जवळीक असल्याचे भासवून मोठं कांड

■मुंबई। प्रतिनिधी,

एका महिलेला राज्यपाल बनवण्याचे आणि तिच्या मुलाला चित्रपटात मुख्य अभिनेत्याची (हिरो) भूमिका मिळवून देण्याचे आमिष दाखवून 10 लाख रुपयांना गंडा घातल्याचा धक्कादायक प्रकार समोर आलाय. पीडित अनिता मिश्रा यांनी राजीवनगर पोलीस ठाण्यात युवराज प्रताप सिंह नावाच्या तरुणाविरुद्ध तक्रार दाखल केली आहे. आरोपीने स्वतःचे बड्या राजकारण्यांशी जवळचे संबंध असल्याचे भासवून पीडितेचा विश्वास संपादन केला. इतकेच नव्हे, तर सिमला येथे जमीन आणि दिल्लीत आलिशान घर मिळवून देण्याचेही प्रलोभन दिले. फसवणुकीचा कळस म्हणजे, "तुमची फाईल राष्ट्रपतींकडे पाठवली आहे, तुम्ही लवकरच राज्यपाल व्हाल," असे सांगून आरोपीने पीडितेकडून वेळोवेळी पैसे उकळले. सिमला येथे जमीन दाखवण्यासाठी नेल्यानंतर तिथल्या एका हॉटेलचे भाडे भरण्याच्या बहाण्यानेही त्याने 1 लाख रुपये लुबाडले. या संपूर्ण कटात त्याने अशोक आणि शाहनवाज नावाच्या व्यक्तींना फोन लावून मोठ्या नेत्यांशी बोलत असल्याचे नाटक केले होते, ज्याला बळी पडून एका सुशिक्षित कुटुंबाला लाखो रुपयांचा आर्थिक फटका बसला आहे. बिहारची राजधानी पाटणा येथे फसवणुकीचा एक अत्यंत धक्कादायक आणि अजब प्रकार समोर आलाय.

**वीज बिल अपडेट आणि नोटा दुप्पट करण्याच्या बहाण्याने सायबर चोरट्यांचा सुळसुळाट**

दुसरीकडे, पाटणा आणि मुझफ्फरपूर परिसरात सायबर गुन्हेगार आणि ठगांनी धुमाकूळ घातला असून वेगवेगळ्या घटनांमध्ये लाखो रुपयांची लूट केली आहे. पाटणा येथे वीज मीटर अपडेट करण्याच्या नावाखाली सायबर चोरट्यांनी तीन जणांना 6.11 लाख रुपयांचा चुना लावला आहे. यामध्ये एसकेपुरी येथील एका रहिवाशाला लिंक पाठवून त्यांच्या खात्यातून 3.91 लाख रुपये लंपास करण्यात आले. तसेच, मुझफ्फरपूर रेल्वे स्थानकावर नोटा दुप्पट करून देण्याच्या बहाण्याने एका प्रवाशाची 50 हजार रुपयांची फसवणूक झाल्याची घटना उघडकीस आली आहे. मुझफ्फरपूर स्थानकावर दोन भावांनी एका प्रवाशाला गाठले आणि पैसे दुप्पट करण्याच्या योजनेचे आमिष दाखवून त्यांच्याकडून 50 हजार रुपये घेतले. त्या बदल्यात प्रवाशाला कागद आणि रुमालात गुंडाळलेले एक बंडल देऊन ते पसार झाले, ज्यावर केवळ एक पाचशेची नोट लावलेली होती. याप्रकरणी रेल्वे पोलिसांनी एका आरोपीला अटक केली असून दुसऱ्याचा शोध सुरू आहे. एकूणच, सध्या चोरट्यांनी फसवणुकीचे नवनवीन मार्ग शोधले असून कोणत्याही संशयास्पद लिंकवर क्लिक न करण्याचे आणि अनोळखी व्यक्तींच्या प्रलोभनांना बळी न पडण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# 'अहो, मला भजी खायची आहेत...' नवऱ्याला कॅन्टीनमध्ये पाठवलं, अन् नवविवाहिता इमरानसोबत पळून गेली!

**नियोजित कट आणि संशयाची सुई**

रिमझिम बेपत्ता झाल्याचे लक्षात येताच पीतमची शुद्ध हरपली. त्याने परिसरात तिचा शोध घेण्याचा प्रयत्न केला, पण तिचा मोबाईल फोनही बंद येत होता. सुरुवातीला तिला काही धोका तर झाला नाही ना, या भीतीने तो व्याकुळ झाला होता. मात्र, बस स्थानकावरील प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, ती फोनवर कोणाशी तरी बोलत खाली उतरली आणि लगबगीने निघून गेली. पीतमने दिलेल्या तक्रारीनुसार, रिमझिमचे लग्न 1 डिसेंबर 2025 रोजी झाले होते, परंतु तिचे लग्नापूर्वीच इमरान नावाच्या तरुणाशी प्रेमसंबंध होते. हा सर्व प्रकार केवळ पळून जाण्यासाठी रचलेला एक बनाव होता, असे आता स्पष्ट झाले आहे. पतीला भजी आणि पाणी आणण्याच्या बहाण्याने दूर पाठवणे, हा त्या कटाचाच एक भाग होता जेणेकरून गर्दीचा फायदा घेऊन ती आपल्या प्रियकरासोबत पसार होऊ शकेल. पीतमने याप्रकरणी ग्राम सागरपूर येथील इमरान या तरुणावर गंभीर आरोप करत पोलिसांत धाव घेतली आहे.

■बीड। प्रतिनिधी,

एका नवविवाहितेने आपल्या पतीला अत्यंत चलाखीने चकवा देत भररस्त्यातून पलायन केले. ही घटना 9 मार्च 2026 रोजी दुपारी 2 च्या सुमारास बिलारी रोडवेज बस स्थानकावर घडली. पीतम सिंह हा आपली पत्नी रिमझिम हिला तिच्या माहेरून म्हणजेच रामपूरहून रिसिव्ह करून आपल्या घरी घेऊन जात होता. माहेरी सण साजरा केल्यानंतर रिमझिम पतीसोबत बसने प्रवास करत होती. मात्र, या आनंदाच्या प्रवासाचे रूपांतर काही वेळातच कायदेशीर गुंतागुंतीत होईल, याची पुसटशी कल्पनाही पीतमला नव्हती. प्रवासादरम्यान बस बिलारी स्थानकावर थांबली असता, रिमझिमने पतीकडे भजी खाण्याची इच्छा व्यक्त केली आणि त्याला कॅन्टीनमध्ये पाठवले. आपल्या पत्नीची हौस पुरवण्यासाठी पीतम आनंदाने खाली उतरला, पण जेव्हा तो हातात भजी घेऊन परतला, तेव्हा त्याची पत्नी जागेवर नव्हती. उत्तर प्रदेशातील मुरादाबाद जिल्ह्यातून ही घटना समोर आली आहे.

**कुटुंबीयांना धक्का आणि गावभर चर्चा**

या घटनेमुळे केवळ पीतमच नव्हे, तर त्याचे संपूर्ण कुटुंब हादरले आहे. पीतमच्या वडिलांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, सून अशा प्रकारचे पाऊल उचलेल याची त्यांना साधी भनकही लागली नव्हती. ज्या सुनेचे स्वागत घरात मोठ्या उत्साहात केले होते, तिनेच घराची अब्रू वेशीवर टांगली असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. ही घटना सध्या संपूर्ण परिसरात चर्चेचा विषय ठरली असून, सोशल मीडियावरही या 'फिल्मी' पलायनाची चर्चा रंगली आहे. लग्नासारख्या पवित्र बंधनाचा उपयोग केवळ स्वार्थासाठी आणि अशा प्रकारे फसवणूक करण्यासाठी केल्याबद्दल नागरिकांमधून संताप व्यक्त केला जात आहे. आता सर्वांचे लक्ष पोलीस तपासाकडे लागले असून, रिमझिम आणि तिचा प्रियकर इमरान कधी सापडतात, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

**पोलीस तपास आणि सीसीटीव्ही फुटेजचा आधार**

पीतम सिंहच्या तक्रारीनंतर बिलारी पोलीस ठाण्यात या प्रकरणाची गंभीर दखल घेण्यात आली आहे. पोलिसांनी तातडीने बेपत्ता झाल्याची नोंद करून तपास उपनिरीक्षक विनीत कुमार यांच्याकडे सोपवला आहे. तपासादरम्यान पोलीस आता बस स्थानकावरील आणि परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज खंगाळत आहेत. रिमझिम आणि इमरान यांच्यातील संपर्काची खातरजमा करण्यासाठी त्यांच्या मोबाईल फोनचे कॉल डिटेल्स रेकॉर्ड (उउफ़) तपासले जात आहेत. तांत्रिक पुराव्यांच्या आधारे दोघांचे लोकेशन ट्रॅक करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संशयित ठिकाणांवर छापे टाकले जात असून लवकरच या प्रकरणाचा छडा लावला जाईल. पत्नीच्या या कृत्यामुळे पीतम पूर्णपणे खचला असून, लग्नानंतरच्या पहिल्याच मोठ्या सणानंतर असा धक्का बसेल असे त्याला वाटले नव्हते.




हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com